cmyk

दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र वर्ष–५ अंक–२७८ गुरूवार दि.५ फेब्रुवारी २०२६ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये

## संपादकीय

### टॅरिफचा दिलासा

भारतावरील आयातशुल्क ५० टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत खाली आणण्याची अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची घोषणा दिलासादायक म्हणायला हवी. या निर्णयामुळे मागच्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या 'शुल्क'काष्ठाला विराम मिळण्याची चिन्हे असली, तरी यासंदर्भातील अमेरिकेच्या अटीशर्ती म्हणजे आवळा देऊन कोहळा काढण्याचा प्रकार नाही ना, हेही तपासले पाहिजे.


# अमेरिकन आयात धोरणाचा महाराष्ट्राच्या कृषीला फटका

## मागील चार महिन्यात कृषी निर्यातीत २६.६% घट

**पुणे । प्रतिनिधी**

अमेरिकेने भारतीय वस्तूंवरील आयात शुल्क २५ टक्क्यांवरून थेट ५० टक्क्यांपर्यंत वाढवल्याने महाराष्ट्राच्या कृषी निर्यातीला मोठा फटका बसला आहे. मागील वर्षी ऑगस्ट ते नोव्हेंबर या चार महिन्यांत राज्यातून अमेरिकेला होणारी अन्न व कृषी उत्पादनांची निर्यात २६.६ टक्क्यांनी घटली असून, निर्यातीचे प्रमाण ५६ हजार टनांवरून ४१ हजार टनांपर्यंत आले. केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाच्या एपीडा आकडेवारीनुसार ही घसरण अमेरिकेच्या आयातशुल्क वाढीच्या धोरणामुळे झाली आहे. परंतु नुकतेच डोनाल्ड ट्रम्प यांनी आयातशुल्क १८ टक्क्यांपर्यंत कमी करण्याची घोषणा केल्याने पुढील काळात निर्यात पुन्हा वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाअंतर्गत काम करणाऱ्या एपीडा च्या आकडेवारीनुसार, ऑगस्ट ते नोव्हेंबर २०२५ या चार महिन्यांत महाराष्ट्रातून अमेरिकेला




### स्थिरता आल्यास राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा

पूर्ण २०२४–२५ आर्थिक वर्षात महाराष्ट्राने अमेरिकेला १ लाख ६० हजार टन अन्न व कृषी उत्पादने निर्यात केली होती, ज्याची किंमत ३ हजार ६८४ कोटी रुपये इतकी होती. या आकडेवारीवरून अमेरिकन बाजार महाराष्ट्रासाठी किती महत्त्वाचा आहे, हे स्पष्ट होते. त्यामुळे पुढील काळात आयातशुल्क धोरणात स्थिरता आली, तर राज्यातील शेतकरी आणि निर्यातदारांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

४१ हजार १२३ टन कृषी व प्रक्रिया केलेली अन्न उत्पादने निर्यात झाली असून त्याची किंमत ७६२ कोटी रुपये इतकी आहे. याच कालावधीत २०२४–२५ मध्ये राज्यातून ५६ हजार ०६२ टन माल निर्यात झाला होता, ज्याची किंमत १ हजार १०८ कोटी रुपये होती. ही घसरण अमेरिकेने वाढवलेल्या आयात शुल्काशी जोडली जात आहे. अमेरिकेने १ ऑगस्ट २०२५ पासून ▶▶ पान २ वर

## महा–टीईटीचा धक्कादायक निकाल!

### ३ लाख ९६ हजारांहून अधिक गुरुजी नापास




**मुंबई । प्रतिनिधी**

**उद्याच्या पिढीला घडवणाऱ्या शिक्षकांची पात्रता ठरवणाऱ्या महा–टीईटी परीक्षेचा २०२५ चा निकाल जाहीर झाला असून, या निकालाने संपूर्ण शिक्षण क्षेत्राला मोठा धक्का दिला आहे. राज्यातील लाखो उमेदवारांनी अपेक्षेने दिलेल्या या परीक्षेत केवळ ११.२८ टक्के उमेदवारच उत्तीर्ण झाले आहेत. तर तब्बल ३ लाख ९६ हजारांहून अधिक उमेदवार नापास ठरल्याने 'गुरुजीच नापास?' असा सवाल उपस्थित होत आहे.**

राज्य परिक्षा परिषदेकडून जाहीर करण्यात आलेल्या माहितीनुसार, एकूण ४ लाख ७५ हजार ६६९ उमेदवारांनी महा–टीईटीसाठी नोंदणी केली होती. त्यापैकी ४ लाख ४६ हजार ७३० उमेदवार प्रत्यक्ष परीक्षेला उपस्थित राहिले, ▶▶ पान २ वर

#### नापासांचे प्रमाण चिंताजनक

इयत्ता पहिली ते पाचवीसाठी असलेल्या पेपर १ मध्ये २ लाखांहून अधिक उमेदवारांनी नोंदणी केली होती. यामध्ये उपस्थित उमेदवारांपैकी केवळ सुमारे ११.४७ टक्केच यशस्वी झाले. पेपर २ म्हणजे इयत्ता सहावी ते आठवीसाठीच्या परीक्षेतही परिस्थिती फारशी वेगळी नव्हती. या पेपरचा निकाल ११.१३ टक्क्यांवरच मर्यादित राहिला.

## थरथरत्या पावलांनी आले, हात जोडले, शरद पवारांची लाडक्या पुतण्याला श्रद्धांजली

**बारामती । प्रतिनिधी**

बारामतीमधील अजित पवारांचे निवासस्थान असलेल्या सह्योग सोसायटीत दोन दिवसांपासून राज्यभरातील पदाधिकारी, कार्यकर्ते पवार कुटुंबीयांच्या सांत्वनासाठी येत आहेत. बुधवारी राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक आणि खासदार शरद पवार यांनी सह्योग सोसायटीत येऊन अजित पवारांना श्रद्धांजली वाहिली. यावेळी, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह अजित पवारांचे संपूर्ण कुटुंब येथे होते.



राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात अकाली निधन झाल्याने राज्यावर शोककळा पसरली असून अद्यापही महाराष्ट्र दु:खातून सावरला नाही. त्यामुळेच, राज्यभरात अजित पवारांच्या आठवणी जागवत त्यांच्या स्मृतींना आदरांजली वाहिली जात आहे. शरद पवार यांनी बारामतीमधील गोविंद बागेतून अजित पवारांचे निवासस्थान असलेल्या सह्योग सोसायटीत ▶▶ पान २ वर

## यवतमाळ जिल्ह्यात जानेवारीमध्ये २१ शेतकरी आत्महत्या

**यवतमाळ । प्रतिनिधी**

**पूर्व विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यात जानेवारी महिन्यात २१ शेतकरी आत्महत्यांच्या घटना घडल्याचा दावा एका सामाजिक कार्यकर्त्याने बुधवारी (दि. ४) केला. तसेच, शेती संकट हाताळण्यात सरकार अपयशी ठरत असल्याचा आरोपही त्याने केला आहे.**

या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशनचे माजी अध्यक्ष किशोर तिवारी यांनी गेल्या महिन्यात आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची अधिकृत यादी शेअर केली आहे. तिवारी यांनी सांगितले की, वारंवार कर्जमाफी देण्याऐवजी दीर्घकालीन कर्जधोरणाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तसेच नगदी पिकांऐवजी भरडधान्ये आणि कडधान्यांच्या लागवडीसाठी ▶▶ पान २ वर

## डॉ.आंबेडकर यांना अभिवादन करण्यापासून पंकजा मुंडेंना रोखले

**लातूर । प्रतिनिधी**

भाजप नेत्या तथा मंत्री पंकजा मुंडे यांना लातूर जिल्ह्यातील जानवळ गावातील ग्रामस्थांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यापासून रोखल्याची घटना समोर आली आहे.

सध्या राजकीय नेत्यांकडून जिल्हा परिषद निवडणुकीसाठीचा प्रचार जोरात सुरू आहे. याच प्रचाराच्या



निमित्ताने भाजप उमेदवारांच्या प्रचारासाठी लातूरमध्ये आलेल्या पंकजा मुंडेंना लोकांच्या रोषाला सामोरे जावे लागले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचारासाठी लातूर मधील जानवळ गावात आलेल्या पंकजा मुंडे यांनी सभेपूर्वी भारतरत्न ▶▶ पान २ वर

## जरांगेंना गोळ्या घालणार कॉल रेकॉर्डिंग व्हायरल

**बीड । प्रतिनिधी**



मराठा आरक्षणासाठी लढणारे मनोज जरांगे पाटील यांना गोळ्या घालण्याची भाषा केल्याची एक ऑडिओ क्लिप तुफान व्हायरल झाली आहे. कराड समर्थकाकडून ही मनोज जरांगे पाटील यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. धक्कादायक म्हणजे कॉलवर बोलताना समर्थकाने धनंजय मुंडे यांचेही नाव घेत धमकावल्याचे ऐकू येत आहे.

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना गोळ्या घालत जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. यामध्ये संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी ▶▶ पान २ वर

## संसदेत केवळ सरकारचीच मर्जी चालते - प्रियांका गांधी

**दिल्ली । प्रतिनिधी**

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शन प्रस्तावादरम्यान लोकसभेत भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी गांधी कुटुंबावर केलेल्या टीकेमुळे राजकारण तापले आहे. या प्रकरणावर काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी–वड्रा यांनी तीव्र शब्दांत संताप व्यक्त केला.



या प्रकरणावर काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी–वड्रा यांनी तीव्र शब्दांत संताप व्यक्त केला असून, संसदेत केवळ सरकारचीच मर्जी चालते हे दाखवण्याचा हा प्रयत्न असून हा लोकशाहीचा घोर अपमान असल्याची टीका त्यांनी केली. लोकसभेत बोलताना निशिकांत दुबे यांनी बुधवारी गांधी कुटुंबावर निशाणा साधण्यासाठी पुस्तकांचा आधार घेतला. राहुल गांधी एका अप्रकाशित पुस्तकाबद्दल बोलू इच्छितात, मात्र मी गांधी कुटुंबाचा पर्दाफाश करणारी अनेक पुस्तके घेऊन आलो आहे, असे म्हणत त्यांनी ▶▶ पान २ वर

## २०२९ ला बीडचा आ.अनिल जगतापच असायला हवा–ना.संजय शिरसाट

### चंपावती महोत्सवाचा उद्घाटन सोहळा संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या सांस्कृतिक क्षेत्राला नवी दिशा देणारा चंपावती महोत्सव सध्या संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेत असून बीडची सकारात्मक ओळख निर्माण करण्यात महोत्सव महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री नामदार संजयजी शिरसाट यांनी केले. चंपावती महोत्सवाच्या भव्य उद्घाटनप्रसंगी बोलताना ना. शिरसाट म्हणाले की, ''अनिलदादा जगताप यांनी राजकारणाचे जोडे बाजूला ठेवून समाजकारण, क्रीडा आणि सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात



सातत्याने उल्लेखनीय कार्य करत सर्व सामान्य जनतेचे आजवर भले केले आहे. बीडच्या प्रतिमेत ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### पुण्याहून मुंबईला जाणाऱ्या सर्व बसेस बंद

पुणेः महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने पुण्यावरून मुंबईला जाणाऱ्या बस रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. पुणे –मुंबई हायवेवर आडोशी बोगद्याजवळ प्रोपेलिन गॅसची वाहतूक करणारा टँकर उलटला आहे, त्यामुळे महामार्गावर मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. त्यामुळेच बससेवा बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होण्याची शक्यता आहे. पुणे मुंबई महामार्गावर आडोशी बोगद्याजवळ प्रोपेलिन गॅसची वाहतूक करणारा टँकर उलटला, त्यामुळे वाहतूक विस्कळीत झाली आहे. गेल्या २० तासांपासून पुणे–मुंबई महामार्गावर ३० किलोमीटरपर्यंत वाहतुकीच्या रांगा लागल्या. या वाहतूक कोंडीमुळे अनेक प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागला. एसटी महामंडळाच्या अनेक बसेसही यात अडकून पडल्या.

### स्वयंरोजगाराला शासन तत्पर–मंगलप्रभात लोढा

मुंबईः जगतिक पातळीवर विविध क्षेत्रात अत्यावश्यक मनुष्यबळाची कमतरता लक्षात घेता दर्जेदार कुशल मनुष्यबळ तयार करणे आणि स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासन तत्पर आहे. राज्यात लागू करण्यात आलेली 'पीएम सेतू योजना' आणि ''मुख्यमंत्री महाफंड स्वयंरोजगार योजना' हा त्याचाच प्रमुख भाग असल्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले. कुर्ला येथील डॉन बॉस्को इन्स्टिटयूट ऑफ टेक्नोलॉजी येथे महाराष्ट्र राज्य कौशल्य स्पर्धेचे (२०२६) उद्घाटन कौशल्य मंत्री लोढा यांच्या हस्ते झाले. नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (एनएसडीसी) आणि महाराष्ट्र कौशल्य विकास सोसायटी (एमएसएसडीसी) यांच्या विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

### भारत–अमेरिका व्यापार कंबरडे मोडणारा–शेट्टी

कोल्हापूरः अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बहुप्रतीक्षित भारत–अमेरिका व्यापार कराराची घोषणा केली. याअंतर्गत भारतावर लादण्यात आलेला करही १८ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे. दरम्यान आता भारत अमेरिकेकडून अनेक वस्तू खरेदी करणार आहे. आता या करारावर माजी खासदार राजू शेट्टी यांनी टीका केली. हा व्यापार करार मंजूर झाला, तर भारतातील शेतकरी आणि दुग्धोत्पादकांचे कंबरडे मोडेल. हा करार म्हणजे थेट भारतीय शेतकऱ्याच्या मृत्यूला दिलेली संमती आहे, असा गंभीर आरोप राजू शेट्टी यांनी केला. या करारामुळे अमेरिकन शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला मका, सोयाबीन, दुग्धजन्य पदार्थ, कापूस आदी उत्पादने मोठ्या प्रमाणावर भारतात आयात केली जातील. परिणामी, देशातील शेतकऱ्यांच्या मालाला योग्य दर मिळणार नाही आणि देशांतर्गत बाजारपेठ उद्ध्वस्त होण्याची भीती आहे.

### तीन सख्ख्या बहिणींची आत्महत्या

गाझियाबाद : ऑनलाईन गेमिंग व्यसनातून तीन सख्ख्या अल्पवयीन बहिणींनी जीवन संपवल्याची हृदयद्रावक घटना उत्तर प्रदेशातील गाझियाबादमध्ये घडली आहे. आईवलिडांनी ऑनलाईन गेम खेळण्यास विरोध केल्यानंतर तिघीनींही इमारतीच्या नवव्या मजल्यांवरून उडी मारून जीवनयात्रा संपवली. तिघींना ऑनलाईन गेम्सचे प्रचंड व्यसन जडले होते आणि कुटुंबियांचा या गोष्टीला तीव्र विरोध होता, असे प्राथमिक पोलीस तपासात स्पष्ट झाले आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.४ फेब्रुवारी २०२६
आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५८.०० क्विंटल | २,२०० | ३,२०२ | २,६०० |
| ज्वारी/हायब्रिड: ११३.५० क्विंटल | १,८०० | ६,२०० | ३,३२० |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १२६.०० क्विंटल | २,५१० | ८,२२१ | ७,४८६ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,५०० | ५,५०० | ५,५०० |
| बाजरी: २७.५० क्विंटल | २,४०० | ३,१३४ | २,८०८ |
| मुग: ३.५० क्विंटल | ६,७०० | ८,१६० | ७,५३६ |
| सोयाबीन: १९१.५० क्विंटल | ५,५०० | ५,६२५ | ५,५९५ |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ४,८० | ४,८०० | ४,८०० |

## देवस्थान ट्रस्ट उद्योग नाही; सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**देवस्थान ट्रस्ट हे औद्योगिक विवाद कायद्याच्या कक्षेत येत नाही. त्यामुळे अशा ट्रस्टला उद्योग मानले जाऊ शकत नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. एका लेखापालास विनाचौकशी सेवेतून कमी केल्याच्या प्रकरणात न्यायालयाने हा निर्णय दिला असला, तरी संबंधित कर्मचाऱ्याला १२ लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे आदेशही न्यायमूर्ती अरविंद कुमार आणि न्यायमूर्ती प्रसन्ना बी. वराळे यांच्या खंडपीठाने दिले.**

लाईव्ह लॉच्या रिपोर्टनुसार, अपीलकर्त्याची लक्ष्मीनारायण देव ट्रस्टमध्ये लेखापाल म्हणून नियुक्ती झाली होती. सलग १२ वर्षे सेवा केल्यानंतर, १ नोव्हेंबर १९९९ रोजी कोणतीही



पूर्वसूचना किंवा चौकशी न करता त्यांना मौखिकरीत्या कामावरून काढून टाकण्यात आले. त्यानंतर त्यांनी कामगार आयुक्तांकडे धाव घेतली होती. वादाच्या काळात ट्रस्टने त्यांची बदली दूरवरच्या ठिकाणी केली होती. २००९ मध्ये कामगार न्यायालयाने लेखापालाचा दावा फेटाळला होता. संबंधित ट्रस्ट ही एक धार्मिक आणि धर्मादाय संस्था असल्याने ती औद्योगिक विवाद कायद्याच्या कलम २(जे) नुसार उद्योग ठरत नाही. येथे कोणतेही उत्पादन किंवा नफा कमावण्याचे काम चालत नाही, असे कामगार न्यायालयाने म्हटले होते. गुजरात उच्च न्यायालयाच्या एकल खंडपीठाने आणि त्यानंतर विभागीय खंडपीठानेही हाच निर्णय कायम ठेवला होता. दरम्यान, प्रतिवादी ट्रस्ट हे एक मंदिर आहे आणि त्यामुळे ते उद्योग या संज्ञेच्या व्याख्येत बसत नाही, असे स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अरविंद कुमार आणि न्यायमूर्ती प्रसन्ना बी. वराळे यांच्या खंडपीठाने उच्च न्यायालयाच्या निकालात हस्तक्षेप करण्यास नकार दिला. मात्र अपीलकर्त्या असणाऱ्या लेखापालाने देवस्थान ▶▶ पान २ वर

## विलिनीकरणाच्या चर्चेत मुख्यमंत्री कुठेच नव्हते

### भाष्य करण्याचा अधिकार नाही–शरद पवार

**बारामती । वृतसंस्था**

दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या मुद्द्यावर भाष्य करणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ज्येष्ठ नेते खा. शरद पवार यांनी टोला लगावला. त्यांना माझ्याबाबतचा उल्लेख रण्याचा काय अधिकार आहे हे समजले नाही. कारण विलिनीकरणाच्या चर्चेत ते कुठेच नव्हते, या शब्दात पवार यांनी मुख्यमंत्र्यांचा समाचार घेतला.

बारामतीत पवार हे पत्रकारांशी बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाच्या मुद्द्यावर भाष्य केले होते. असे काही असते तर अजितदादांनी मला कल्पना दिली असती. तसेच विलीनीकरणाचा मुद्दा होता तर शरद पवार हे एनडीए सोबत येणार होते का ? असा सवाल मुख्यमंत्र्यांनी केला होता. यावर पवार यांना प्रश्न विचारला असता त्यांनी मुख्यमंत्र्यांना भाष्य करण्याचा अधिकार नसल्याचे म्हटले. तसेच ही चर्चा अजित पवार व जयंत पाटील यांच्यात सुरु होती. ती पूर्णपण गैर राजकीय ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# टॅरिफचा दिलासा

भारतावरील आयातशुल्क ५० टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत खाली आणण्याची अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची घोषणा दिलासादायक म्हणायला हवी. या निर्णयामुळे मागच्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या 'शुल्क'काष्ठाला विराम मिळण्याची चिन्हे असली, तरी यासंदर्भातील अमेरिकेच्या अटीशर्ती म्हणजे आवळा देऊन कोहळा काढण्याचा प्रकार नाही ना, हेही तपासले पाहिजे. भारत आणि रशिया यांच्यातील मित्रत्व व भारतीयांचे अमेरिकेतील वाढते प्रस्थ, ही ट्रम्प यांची पोटदुखी आहे. त्यामुळे अतिरिक्त आयातशुल्क लावून भारताची कोंडी करण्याचा प्रयत्न केला.

प्रारंभी २५ टक्के टॅरिफ लावण्यात आल्यानंतर रशियाकडून तेल खरेदी केल्याबद्दल भारतावर अतिरिक्त २५ टक्के टॅरिफ लावण्यात आला होता. त्यामुळे एकूण टॅरिफ ५० टक्क्यांवर पोहोचल्याचे दिसून येते. पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यातील शुल्कवाढीचा भारतावर काही प्रमाणात परिणाम झाला, हे खरे. तथापि, अशा परिस्थितीतही भारताने आपल्या अर्थकारणाला धक्का लागणार नाही, याची पुरेपूर काळजी घेतली. उलटपक्षी अमेरिकेमध्ये या निर्णयामुळे महागाई वाढल्याचे पहायला मिळाले. या पार्श्वभूमीवर अनेक वर्षांपासून रखडलेला भारत व अमेरिकेतील व्यापारी करार मार्गी लागणे, तत्काळ प्रभावाने त्याची अंमलबजावणी होणार असल्याची घोषणा दस्तुरखुद्द ट्रम्प यांच्याकडून होणे, याचे महत्त्व अधिक होय. या करारामुळे दोन देशातील व्यापार कोंडी फुटली, असे म्हणायला हरकत नाही. तथापि, ट्रम्प यांचे बेभरवशी वर्तन पाहता यासंदर्भातील अधिक तपशील समोर येणेही आवश्यक असेल. किंबहुना, जे झाले, तेही समाधानकारक ठरावे. मुख्य म्हणजे या व्यापार करारामुळे दोन देशांमध्ये नवे व्यापारी पर्व निर्माण होण्याच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. विशेष म्हणजे भारतीय बाजारपेठेत अमेरिकन उत्पादने स्वस्त होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. इलेक्ट्रॉनिक व घरगुती वस्तू तसेच कृषी उत्पादने स्वस्त झाली, तर नक्कीच भारतीय ग्राहकांना दिलासा मिळेल. अमेरिकेच्या ताठर भूमिकेमुळे भारतीय उद्योजक व निर्यातदारांमुळे चिंतेचे वातावरण होते. परंतु, चिंतेचे हे मळभ काहीसे दूर झाल्याचे दिसून येते. आयातशुल्काच्या कपातीमुळे भारतीय कपड्यांवरील टॅरिफ कमी होईल आणि त्यातून भारतीय कपड्यांची मागणी वाढेल. याशिवाय सोन्या-चांदीचे दागिने, केमिकल्स, इंजिनिअरिंग उत्पादनांनाही अमेरिकेत पुन्हा चांगली बाजारपेठ मिळू शकेल. हे नक्कीच सकारात्मक होय. मात्र, स्टील, ॲल्युमिनियम, तांबे यावरील आयात शुल्क अजूनही ५० टक्क्यांच्या आसपास असल्याचे सांगितले जाते. तर ऑटो कंपोनंट्सवरही २५ टक्के टॅरिफ कायम असल्याने वाहन उद्योगालाही फारसा दिलासा मिळाला नसल्याकडे लक्ष वेधण्यात येते. शिवाय हा करार अटीशर्तीवर आधारित असल्याचे दिसते. रशियाकडून तेलखरेदी थांबवणे आणि अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणात व कदाचित व्हेनेझुएलाकडूनही तेल खरेदी करण्याची अट यात असल्याची माहिती पुढे येत आहे. रशियाकडून भारताला स्वस्त तेल मिळायचे. ते बंद करायला लावून व्हेनेझुएलाचे महागाडे तेल आपल्या माथी मारले गेले, तर त्याचा आपल्याला फटकाच बसणार. रशिया हा भारताचा जुना मित्र. संकटात नेहमीच रशियाने आपल्याला मदत केली. भारत आणि पाकिस्तानच्या युद्धात अमेरिका आणि चीनची भूमिका अप्रत्यक्ष भारतविरोधीच होती. तथापि, या काळात रशियाचे आपल्याला बहुमूल्य सहकार्य मिळाले. युद्धसंघर्षात रशियन शस्त्रास्त्रे किती प्रभावी ठरली, हे वेगळे सांगायला नको. आता तेल खरेदीबंदीच्या निर्णयामुळे दोन देशांतील मैत्रीत दरी पडणार नाही ना, याची दक्षता घ्यावी लागेल. त्याचबरोबर रशियासोबतच्या व्यापारी संबंधाकडेही लक्ष द्यावे लागेल. खरे तर कुणाचे मित्र व्हावे, असे ट्रम्प यांचे व्यक्तिमत्त्व नाही. आयात शुल्क कपातीच्या बदल्यात त्यांनी अमेरिकेच्या भारतात येणाऱ्या वस्तूंवरील कर ० टक्के इतका केला. त्याचबरोबर ५०० अब्ज डॉलर्सचा करारही केला. ऊर्जा, तंत्रज्ञान, कृषी, कोळसा आणि इतर उत्पादनांची ५०० अब्ज डॉलरहून अधिकची आयात करण्यास भारत तयार असल्याचे ट्रम्प महोदयांनी सांगितले. यातून आपल्या देशाचा मोठा फायदा त्यांनी करून घेतला, असे म्हणता येईल. या कराराचे वर्णन जागतिक माध्यमांनी अभूतपूर्व, तर अमेरिकन माध्यमांनी रणनीतिक मैलाचा दगड असे केले आहे. परंतु, मूडिजने रशियाकडून कच्चे तेल खरेदी करणे थांबवल्याने भारताच्या आर्थिक वाढीला अडथळा येऊ शकतो, असे म्हटले आहे. यातून ऊर्जा पुरवठा साखळीत मोठा व्यत्यय येईल. देशांतर्गत इंधनाच्या किमती वाढतील आणि महागाईचा धोका वाढेल, असा इशाराही दिला आहे. हे बघता मूडिज म्हणते त्याप्रमाणे भारताला कोणतेही मोठे बदल हळूहळू किंवा संतुलित पद्धतीने अंमलात आणावे लागतील. अन्यथा, किंमत आणि विकास या दोहोंवर त्याचा नकारात्मक परिणाम संभवतो. व्यापार करार झाल्याचे संयुक्त निवेदन, वाटाघाटी केलेला मसुदा समोर यायला हवा. त्याशिवाय अंमलबजावणीच्या संदर्भात स्पष्टता येणार नाही. जल्लोषापूर्वी याचे भान ठेवत सावधगिरी बाळगली पाहिजे, अशी अपेक्षाही आर्थिक व व्यापारी क्षेत्रातील तज्ज्ञांकडून व्यक्त होते. त्यामुळे ट्रम्प यांनी आयातशुल्क कमी केल्याबाबत आपण समाधान व्यक्त करण्यात काहीही गैर नसले, तरी नाचून आनंद साजरा करणे टाळायला हवे. ट्रम्प यांच्या धरसोडवृत्तीची मोदींना चांगलीच कल्पना आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी संयतपणे आणि सावधानतेनेच पुढे जातील, यात कोणतीही शंका नाही. भारत आणि अमेरिका हे जगातील सर्वात मोठे लोकशाही देश आहेत. म्हणूनच या दोन देशांनी कोणतेही किंतु परंतु न ठेवता आर्थिक पातळीवर एकत्र काम करणे, ही काळाची गरज आहे. म्हणूनच ट्रम्प यांनी व्यापारी मैत्रीत कोणतीही संदिग्धता ठेऊ नये.

# चोरी प्रकरणी आरोपी अटक; ८.३९ लाखांचा मुद्देमाल जप्त

परतुर । प्रतिनिधी

**दुकानातील गल्ल्यातील सुमारे १० लाख रुपयांची रोख रक्कम चोरून नेल्याची घटना घडली होती. रोडवरील समर्थ ट्रेडर्स या आडत दुकानात झालेल्या घरफोडी प्रकरणी परतुर पोलिसांनी कारवाई करत मुख्य आरोपीसह दोन विधीसंघर्ष बालकांना ताब्यात घेत तब्बल ८ लाख ३९ हजार १९० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे एक घरफोडीचा गुन्हा उघडकीस आला आहे. दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी समर्थ ट्रेडर्स दुकानाच्या पाठीमागील भिंतीतील लहान खिडकीची जाळी तोडून दुकानात प्रवेश केला.**

या प्रकरणी दुकानाचे मालक प्रभाकर , रा. आनंदवाडी, परतुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून परतुर पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास करत असताना आरोपी पुणे येथे असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार परतुर पोलिसांनी वेशांतर करून फिल्मीस्टाईल पाठलाग करत एका



हॉटेलमधून सावता एकनाथ शिंदे, रा. मानेगल्ली, परतुर याच्यासह दोन विधीसंघर्ष बालकांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी सदर घरफोडी केल्याची कबुली दिली. आरोपींकडून ६ लाख १९० रुपये रोख रक्कम, सॅमसंग आरोपींकडून ६ लाख १९० रुपये रोख रक्कम, सॅमसंग कंपनीचे २२ अल्ट्रा व गॅलेक्सी झेड फोल्ड ५ हे दोन मोबाईल, आयफोन कंपनीचा ॲपल १४ मोबाईल, चांदीच्या दोन त्रिशूळ बाळ्या, दोन बॅग, बोट कंपनीचे इअरबड तसेच दोन मोठे धारधार चाकू असा एकूण ८ लाख ३९ हजार १९० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मुख्य आरोपी सावता एकनाथ शिंदे यास अटक करण्यात आली असून उर्वरित दोघे विधीसंघर्ष बालक आहेत. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक अमोल रावते करीत असून आरोपीकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अजय बन्सल, अपर पोलीस अधीक्षक आयष नोपानी. उपविभागीय पोलीस अधिकारी आर. टी. रेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुदाम भागवत, पोउपनि अमोल बी. रावते तसेच पोलीस कर्मचारी गजानन राठोड, नरेंद्र चव्हाण, खंदारे, जाधव, माने, वाघ व हाडे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# पाच महिन्यापासून पगार नाही कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ

जालना । प्रतिनिधी

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा२ आणि जल जीवन मिशन अंतर्गत महाराष्ट्र राज्याला देशात नावलौकिक प्राप्त करून देणाऱ्या कर्मचाऱ्यांवर मागील पाच महिन्यापासून वेतन नसल्याने उपासमारीची वेळ आली असून राज्यभरातील पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातील कर्मचारी आजपासून काम बंद आंदोलनावर गेले आहेत.

प्रलंबित मानधन, सेवा सुरक्षा आणि भविष्यातील मानधन वितरणाबाबत लेखी हमी मिळेपर्यंत दिनांक ४ ते ८ फेब्रुवारी दरम्यान जिल्हास्तरावर आंदोलन सुरू राहणार आहे. ऑक्टोबर २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीतील मानधन अद्याप न मिळाल्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांवर गंभीर आर्थिक संकट ओढवले आहे. घरभाडे, मुलांचे शिक्षण, वैद्यकीय खर्च आणि दैनंदिन गरजा भागवणे कठीण झाले असतानाही हे कर्मचारी ग्रामपंचायत, तालुका आणि जिल्हा स्तरावर नियमितपणे सेवा देत आहेत. हे कर्मचारी ग्रामपंचायतांमधील प्रत्यक्ष अंमलबजावणी, क्षेत्रीय तपासणी, लाभार्थी समन्वय, ऑनलाईन नोंदी व अहवाल सादरीकरणाची जबाबदारी पार पाडत असून जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरील नियोजन आणि देखरेखीमध्येही त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. ४ महिने मानधन न मिळाल्याने त्यांच्या मानसिक आरोग्यावर व कौटुंबिक जीवनावर गंभीर परिणाम आहे. महाराष्ट्र राज्य पाणी व स्वच्छता शासकीय कंत्राटी कर्मचारी कृती समितीने या बाबत वारंवार राज्य शासनाकडे निवेदने सादर केली आहेत. निधी वितरणातील व प्रशासकीय विलंबामुळे मानधन रखडल्याचे कारण दिले जात असले, तरी अद्याप कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांना न्यायासाठी मानवाधिकार आयोगाकडे दाद घ्यावी लागली आहे. ४ ते ८ फेब्रुवारी दरम्यान जिल्हास्तरीय आंदोलनानंतर पुढील टप्प्यात दिनाक ९ फेब्रुवारी पासून आंदोलन मुंबई येथील आझाद मैदानावर करण्यात येणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री यांनी तातडीने या प्रकरणी हस्तक्षेप करून या संवेदनशील प्रश्नावर निर्णय घ्यावा, अन्यथा स्वच्छ भारत मिशन आणि जल जीवन मिशनच्या अंमलबजावणीवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता असल्याचा इशारा कृती समितिचे अध्यक्ष रमाकांत गायकवाड यांनी दिला आहे.

## पान ६ वरून...

### बीड शहरात स्व.अजितदादांचा पुर्णाकृती

असेही ते यावेळी म्हणाले. दुपारी २ वाजेपर्यंत राष्ट्रवादी कार्यालयात स्व.दादांचा अस्थीकलश दर्शनासाठी ठेवण्यात आला होता. त्यानंतर आ. विजयसिंह पंडित अस्थीकलश घेऊन श्री क्षेत्र राक्षसभुवन (शनिचे) येथे रवाना झाले. यावेळी उपस्थितांनी अजितदादा अमर रहे, एकच वादा अजितदादा अशा घोषणा दिल्या. याप्रसंगी भावनिक वातावरण बनले होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस माजी आमदार अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित, आ. धनंजय मुंडे, आ. प्रकाश सोळंके, माजी आमदार बाळासाहेब आजबे, भिमराव धोंडे, संजय दौंड, रमेश आडसकर, बाजीराव धर्माधिकारी, माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, नगराध्यक्षा श्रीमती प्रेमलता पारवे, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, राष्ट्रवादी ओबीसी सेलचे कल्याण आखाडे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, सभापती शेख निजाम, दिलीप गोरे, अमर नाईकवाडे, संपादक शेख मुजीब, शेख तय्यब, बळीराम गवते, जैतुल्ला खान, जकी सौदागर, बाळासाहेब गुंजाळ, संजय उडान, अशोक हिंगे, प्रज्ञाताई खोसरे, ॲड.राजेंद्र राऊत, सुनिल पाटील, राजाभाऊ औताडे, अयुब पठाण, वैजिनाथ साळुंके, कल्याण आबुज, भागवत तावरे, भाऊसाहेब नाटकर, जगन्नाथ काळे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच बीड शहरातील अजितदादाप्रेमी नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---------

### अंबाजोगाईत १५३ बालकांची

हृदयरोगतज्ज्ञ डॉ. पंकज सुगावकर, डॉ. नवनाथ घुगे, डॉ.राहुल धाकडे, डॉ.श्रीनिवास रेड्डी,डॉ.सुधीर धर्मपात्रे, डॉ.सचिन पोतदार,डॉ. अतुल शिंदे,डॉ.महेंद्र लोमटे आणि आरवीएसकेचे समन्वयक रमेश तांगडे आदी उपस्थित होते. डॉ.पंकज सुगावकर व डॉ.श्रीनिवास रेड्डी यांनी बालकांमधील हृदयविकाराची लक्षणे आणि आधुनिक उपचार पद्धतींबाबत मार्गदर्शन केले. अक्षय मुंदडा,डॉ. नवनाथ घुगे,डॉ.संतोष कुलकर्णी, रोहिणी पाठक आदींनी उपस्थितांना मार्गदर्शन केले,शिबिरात बालकांची टू डी इको कार्डिओग्राफीची तपासणी डॉ.पंकज सुगावकर यांनी केली. यामध्ये ज्या बालकांना हृदय शस्त्रक्रियेची गरज असेल त्यांची ते मोफत शस्त्रक्रिया पूर्ण येथे करणार आहेत अध्यक्षीय समारोप अक्षय मुंदड़ा यांनी केला. शिबिरात बालकांची २ ही इको कार्डिओग्राफीची तपासणी डॉ.पंकज सुगावकर यांनी केली. डॉ.नवनाथ घुगे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन संतोष मोहिते यांनी तर रोहिणी पाठक यांनी आभार मानले. या शिबिरामुळे अंबाजोगाई व परिसरातील अनेक गरीब व गरजू कुटुंबांना मोठा आधार मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

--------------

### बीड शहरासाठी बिंदुसरा प्रकल्पातून नवीन

सर्व झोनमधील वितरण व्यवस्था सुरळीत करण्यासाठी निर्देश देण्यात यावेत. तसेच, महावितरण कंपनीची बीड नगरपरिषदेकडे असलेली थकबाकी हा जटील प्रश्न सोडवून पाणीपुरवठा योजनांमध्ये अडथळे निर्माण होऊ नयेत, यासाठी जिल्हा प्रशासनाने पुढाकार घ्यावा, अशी मागणी डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केली आहे. यावेळी मुख्याधिकारी शैलेश फडसे, माजी नगरसेवक गणेश वाघमारे, रवी कदम, नगरसेवक सय्यद मुस्तफा, नगरसेविका मीना जाधव, समीक्षा शेटे, सावित्री साखरे, भाग्यश्री तांबारे भाग्यश्री देशपांडे, ॲड.नागेश तांबारे, विकास जोगदंड, संपादक साहस आंदोडे, ॲड.गोविंद शिराळे, बाळासाहेब गुजर, सागर देशपांडे, मंगेश धोंगडे, सनी माने, राकेश जाधव, नितीन साखरे, माणिक वाघमारे, विशाल राऊत यांच्यासह भाजपचे आजी-माजी नगरसेवक, पदाधिकारी उपस्थित होते.

----------------

### विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी स्वच्छतागृहाची

कोणतीही दिरंगाई होणार नाही याची दक्षता घेण्याचेही आदेश देण्यात आले आहेत या निर्णयामुळे जिल्हा परिषद शाळा मधील विद्यार्थ्यांचे आरोग्य सुरक्षित राहण्यास मदत होईल असा विश्वास ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिला आहे

-----------

### पाटोदा तहसील कार्यालयात

लावणे अनिवार्य आहे. मात्र, पाटोदा तहसीलमध्ये असा कोणताही फलक दिसून येत नाही. फलक नसल्याचा फायदा घेत नागरिकांची दिशाभूल केली जात आहे.

**प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष:**

या लुटमारीमुळे पाटोदा तालुक्यातील जनतेमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी आणि तहसीलदारांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन दोषींवर कठोर कारवाई करावी आणि कार्यालयात तत्काळ अधिकृत दर फलक लावावेत, अशी मागणी सर्वसामान्य जनतेतून होत आहे. जर ही लूट थांबली नाही, तर आंदोलनाचा पवित्रा घेण्याचा इशाराही काही नागरिकांनी दिला आहे.

---------

### ग्लोबल विकास ट्रस्टचे काम

जोड मिळायला हवी, शेतकऱ्यांना नवनव्या तंत्रज्ञानाची माहिती व्हायला हवी आणि युवा शेतकऱ्यांनी नव्या उत्साहाने शेतीकडे भविष्य म्हणून पाहावे यासाठी त्यांनी कौशल्य पारंगत होण्यासाठी ग्लोबल विकास ट्रस्ट काम करत आहे. यासाठी राज्य सरकारकडून सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही ना.मंगलप्रभात लोढा यांनी दिली. बुधवारी ते पोहनेर येथे जोशी कुटुंबियांच्या सांत्वनासाठी आले होते. सांत्वन भेट झाल्यानंतर त्यांनी सिरसाळा येथील ग्लोबल विकास ट्रस्टच्या कृषीकुल शेतकरी प्रशिक्षण केंद्रास भेट दिली. यावेळी विविध जिल्ह्यांतून प्रशिक्षण घेण्यासाठी आलेल्या शेतकऱ्यांशी त्यांनी संवाद साधला. ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी यांच्याशी मराठवाड्यातील शेती आणि शेतकऱ्यांच्या भविष्यातील व्यावसायिक संधी याबद्दल विस्तृत चर्चा झाली. शेतकऱ्यांसाठी आवश्यक असलेले तांत्रिक प्रशिक्षण ग्लोबल विकास ट्रस्टकडून दिले जात आहे. चे काम शेतकऱ्यांचे जीवन उंचावण्याच्या दृष्टीने मैलाचा दगड ठरेल असे विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## पान १ वरून...

### अमेरिकन आयात धोरणाचा

भारतीय वस्तूंवर २५ टक्के आयात शुल्क लावले होते, तर २७ ऑगस्टपासून ते वाढवून ५० टक्के करण्यात आले. या निर्णयाचा थेट फटका महाराष्ट्रातील निर्यातदारांना बसला आहे. मात्र, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय वस्तूंवरील शुल्क १८ टक्क्यांपर्यंत कमी करण्याची घोषणा केल्याने पुढील काळात परिस्थिती सुधारण्याची शक्यता आहे. शुल्क कपात ही भारतीय निर्यातदारांसाठी दिलासादायक बाब असून त्यामुळे महाराष्ट्राची अन्न व कृषी निर्यात पुन्हा गती पकडू शकते. मात्र, अमेरिकेच्या बाजारात व्हिएतनाम, चीन आणि फिलिपाइन्ससारख्या देशांशी तीव्र स्पर्धा असल्याने कमी टॅरिफ महत्त्वाची ठरणार आहे.

----------

### थरथरत्या पावलांनी आले, हात जोडले,

जाऊन अजित पवारांच्या प्रतिमेसमोर हात जोडून श्रद्धांजली अर्पण केली. थरथरत्या पाऊलांनी पुढे येत, सुरक्षा रक्षकाच्या हाताला हात धरुन शरद पवार पुढे आले. त्यानंतर, अजित पवारांच्या प्रतिमेसमोर डोकं खाली करुन हात जोडले. आपल्या लाडक्या पुतण्याला काकांकडून श्रद्धांजली वाहतानाचा हा क्षण सगळ्यांच्या काळजाला हात घालणारा होता. यावेळी, संपूर्ण पवार कुटुंबीय भावुक झाल्याचे पाहायला मिळाले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पार्थ पवार, जय पवार, नीता पाटील, विजया पाटील, श्रीनिवास पवार, रोहित, राजेंद्र, रणजित पवार याठिकाणी उपस्थित होते.

-----------

### महा-टीईटीचा धक्कादायक

तर सुमारे २८ हजार ९३९ उमेदवार गैरहजर राहिले. अंतिम निकालात फक्त ५० हजार ३६९ उमेदवार पात्र ठरले असून उर्वरित ३ लाख ९६ हजार ३२५ उमेदवार अनुत्तीर्ण झाले आहेत. माध्यमनिहाय आणि विषयनिहाय निकाल पाहिल्यासही मोठी तफावत दिसून येते. कन्नड माध्यमाचा निकाल तुलनेने चांगला असून तो १५ टक्क्यांच्या पुढे आहे. मराठी, हिंदी आणि तेलुगू माध्यमाचा निकाल सरासरीच्या आसपास आहे. मात्र उर्दू, इंग्रजी आणि विशेषत: गुजराती माध्यमाचा निकाल अत्यंत कमी टक्केवारीत आहे. गणित-विज्ञान आणि सामाजिक विज्ञान या विषयांमध्येही अपेक्षेपेक्षा कमी निकाल लागल्याचे स्पष्ट झाले आहे.

--------

### जरांगेंना गोळ्या घालणार

वाल्मीक कराड याचे नाव घेण्यात आले आहे. सध्या ही कॉल रेकॉर्डिंग सोशल माध्यमावर व्हायरल होत आहे. संबंधित कॉल रेकॉर्डिंगमध्ये एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला बोलत असताना थेट मनोज जरांगे यांना मी गोळ्या घालून जीवे मारणार असल्याचे बोलत आहे. त्याचबरोबर पुन्हा धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड म्हणायचे नाही, नसता तुलाही जीवे मारतो अशी धमकी कराड समर्थकांनी दिली. ही कॉल रेकॉर्डिंग सध्या प्रचंड प्रमाणात सोशल माध्यमांवर व्हायरल झाली आहे.यामध्ये किती तत्थ्य आहे सांगणे कठीण आहे.

-----------

### डॉ.आंबेडकर यांना अभिवादन

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केले नाही, असा मुद्दा ग्रामस्थांनी उपस्थित केला. सभेनंतर जेव्हा मुंडे या बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी गेल्या तेव्हा स्थानिकांनी त्यांना रोखले. यावेळी ग्रामस्थांचा वाढता विरोध आणि संताप पाहता मुंडेंनी अभिवादन न करताच घटनास्थळावरून काढता पाय घेतला. या घटनेचा व्हीडीओ आता सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. दरम्यान, पंकजा मुंडे यांच्या आधी भाजप नेते आणि मंत्री गिरीश महाजन यांना देखील नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागले होते. नाशिक येथे प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात मंत्री गिरीश महाजन यांचे भाषण झाले. मात्र, महाजन यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख न केल्याने महिला वन अधिकाऱ्याने जाहीरपणे नाराजी व्यक्त केली होती. यानंतर अनेक ठिकाणी महाजन यांचा निषेध करण्यात आला होता. त्यानंतर मंत्री महाजन यांनी या प्रकरणी भूमिका मांडून आपल्याकडून अनावधानाने बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव राहिल्याचे सांगत दिलगिरी व्यक्त केली होती.

---------------

### यवतमाळ जिल्ह्यात जानेवारीमध्ये

शेतकऱ्यांना योग्य प्रोत्साहन मिळणे गरजेचे आहे. कापूस आणि सोयाबीनसारख्या पिकांमुळेच १९९८ पासून शेतकरी आत्महत्यांची मालिका सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, यवतमाळचे जिल्हाधिकारी विकास मीना यांनी २०२६ च्या पहिल्या महिन्यात जिल्ह्यात २१ शेतकरी आत्महत्यांची नोंद झाल्याची माहिती दिली. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी आणि अडचणीत सापडलेल्या शेतकरी कुटुंबांना मदत करण्यासाठी राज्य सरकारकडून 'मिशन उभारी अभियान' राबवले जात असून, त्याअंतर्गत मोठ्या प्रमाणात मदत देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. 'मिशन उभारी' अभियानाचा उद्देश शेतकरी आत्महत्या रोखणे आणि संकटग्रस्त शेतकरी कुटुंबांचे पुनर्वसन करणे हा आहे. त्याअंतर्गत पात्र शेतकरी लाभार्थी कुटुंबांना आर्थिक मदतीचे डिमांड ड्राफ्ट तसेच विविध शासकीय योजनांसाठी लागणारी प्रमाणपत्रे मी स्वतः दिल्याचे जिल्हाधिकारी मीना यांनी स्पष्ट केले. त्याचबरोबर, या अभियानांतर्गत अडचणीत असलेल्या कुटुंबांना मानसिक तसेच सामाजिक आधारही देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

-----------

### २०२९ ला बीडचा आ.अनिल जगतापच

बदल घडवून आणण्यासाठी त्यांचे योगदान मोलाचे आहे. त्यामुळे २०२९ मध्ये बीडचा आमदार अनिल जगतापच असायला हवा, असे आवाहन त्यांनी उपस्थित बीडकरांना केले. अनिलदादा जगताप फाउंडेशन व बीड शिवसेना आयोजित चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे महाकरंडक २०२६ या स्पर्धेचा भव्य उद्घाटन सोहळा दि. ४ फेब्रुवारी रोजी उत्साहात पार पडला. या वेळी शिवसेनेच्या उपनेत्या संगीता ठोंबरे, संपादक गंमत भंडारी, संपादके संतोष मानूरकर, संपादक जालिंदर धांडे, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर, महिला आघाडी संपर्क प्रमुख संगीता चव्हाण, शिवसेना, युवासेना महिला आघाडी, ओबीसी व्हिजिएनटी सेना, एस.टी. कामगार सेनेचे आजी-माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटन सोहळ्याचे प्रास्ताविक चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कांबळे यांनी केले. त्यांनी महोत्सवाच्या संकल्पनेपासून ते आयोजनापर्यंतची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. शिवसेनेच्या उपनेत्या संगीता ठोंबरे यांनी अनिलदादा जगताप यांच्या कार्याचे कौतुक करत चंपावती महोत्सव हा बीडच्या सांस्कृतिक क्षेत्रातील मैलाचा दगड ठरत असल्याचे सांगितले. संपादक संतोष मानूरकर यांनी ''चंपावती महोत्सव चिरायू होवो'' अशा शुभेच्छा दिल्या, तर संपादक गंमत भंडारी यांनी कलाकारांसाठी अनिलदादा जगताप करत असलेल्या कार्याचे विशेष कौतुक केले. शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप म्हणाले की, महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते सन्माननीय एकनाथ शिंदे साहेब आणि संसद रत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त बीडच्या कलाक्षेत्राला समृद्ध करण्याच्या उद्देशाने चंपावती महोत्सवाची सुरुवात करण्यात आली आहे. कलेचा वारसा चंपावती महोत्सवाच्या माध्यमातून अखंडितपणे पुढे नेण्याचे आम्ही सर्व कलाकारांना आश्वासन देतो, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी उद्घाटन सोहळ्यास उपस्थित सर्व मान्यवरांचे व कलाकारांचे अनिलदादा जगताप यांनी आभार मानले.

**चंपावती भूषण पुरस्काराने सन्मान**

चंपावती महोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय व प्रेरणादायी कार्य करणाऱ्या मान्यवरांचा 'चंपावती भूषण पुरस्कार' देऊन गौरव करण्यात आला. यावेळी डॉ. विनिता ढाकणे यांना शैक्षणिक व आरोग्यसेवेसाठी, प्रणिता गंगाखेडकर (शिक्षण विस्तार अधिकारी) यांना जिल्हा परिषद शाळेच्या आदर्शवत कार्यासाठी, शेख अजहर यांना क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल, नितीन कोटेचा यांना उद्योजक तसेच सामाजिक क्षेत्रातील आदर्शवत कार्याबद्दल आणि मनोज धस यांना शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल चंपावती भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

----------

### संसदेत केवळ सरकारचीच

काही संदर्भ वाचून दाखवण्यास सुरुवात केली. यावेळी सभागृहाचे कामकाज पाहत असलेले सभापती कृष्णा प्रसाद तेन्नेती यांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला. सभापतींनी आधीच अशा प्रकारच्या टिप्पण्यांना परवानगी न देण्याचा निर्णय दिला असल्याचे सांगत दुबे यांना मज्जाव केला. मात्र, यावरून सभागृहात प्रचंड गदारोळ झाला आणि कामकाज ५ वाजेपर्यंत तहकूब करावे लागले. यानंतर प्रियांका गांधी यांनी माध्यमांशी संवाद साधताना केंद्र सरकारवर गंभीर आरोप केले. निशिकांत दुबे हे सरकारच्या परवानगीशिवाय बोलत नाहीत, असा दावा त्यांनी केला. जेव्हा सरकारला सभागृहाचे कामकाज विस्कळीत करायचे असते, तेव्हाच अशा खासदारांना उभे केले जाते, असा टोला त्यांनी लगावला. त्या म्हणाल्या की, विरोधी पक्षनेत्यांना ॲमेझॉनवर उपलब्ध असलेल्या प्रसिद्ध पुस्तकातील संदर्भ देण्याची परवानगी नाकारली जाते आणि त्याला नियमांचे उल्लंघन ठरवले जाते. मात्र, सत्ताधारी पक्षाचा खासदार पुस्तके वाचून दाखवतो तेव्हा त्यांचा माईक सुरूच राहतो, हा दुजाभाव लोकशाहीसाठी घातक आहे. हे सरकार संसदेच्या नियमांना डावलून केवळ आपली सत्ता गाजवण्याचा सरकारचा हा प्रयत्न असून, हे केवळ सभापतींचेच नव्हे तर संपूर्ण देश आणि जनतेचा अपमान करणारे कृत्य आहे. या घटनेनंतर काँग्रेस खासदारांच्या शिष्टमंडळाने लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट घेऊन आपला निषेध नोंदवला आहे.

---------

### विलिनीकरणाच्या चर्चेत

स्वरुपाची होती, असे पवार यांनी स्पष्ट केले. पवार म्हणाले, अजितदादा पवार यांच्या अकाली निधनामुळे आम्हा लोकांसमोर जे संकट आहे, त्यातून परस्परांना धीर देणे आणि पढे कसे जायचे यावर आमचे लक्ष आहे. राजकीय निर्णयाशी संबंधित आंम्ही कोणाशी चर्चा करत नाही. माजी लष्करप्रमुख नरवणे यांचा उल्लेख विरोधी पक्षाकडून देशाच्या संसदेत होत असेल तर राहूल गांधी यांना लोकसभेत बोलण्याची संधी देणे आवश्यक होते. संसदीय परंपरेनुसार चर्चेला उत्तर देण्याचा अधिकारी दिला गेला पाहिजे, राहुल गांधी यांच्यावर कोणताही दबाव होता की नाही, याबाबत आपल्याकडे ठोस माहिती नाही असे सांगून पवार यांनी त्यांच्या संसदीय कारकिर्दीचा उल्लेख केला. ते म्हणाले, गेल्या ५८ वर्षात महाराष्ट्र विधानसभा, लोकसभा आणि राज्यसभेत मी कधीही गैरहजर राहिलेलो नाही. मात्र अलिकडे घडलेल्या दुर्दैवी घटनेमुळे अंदाजपत्रक सत्राला उपस्थित राहता आलेल नाही. तरीही या काळात काही समाधानकारक निर्णय घेतल्याचे त्यांनी नमूद केले.

---------------

### देवस्थान ट्रस्ट उद्योग नाही

ट्रस्टमध्ये १२ वर्षे निष्कलंक आणि अखंड सेवा दिली होती, ही बाब सर्वोच्च न्यायालयाने विचारात घेतली. न्याय मिळण्याच्या दृष्टीने न्यायालयाने ट्रस्टला आदेश दिले की, संबंधित कर्मचाऱ्याला १२ लाख रुपये एकरकमी नुकसानभरपाई म्हणून देण्यात यावेत. ही रक्कम चार आठवड्यांच्या आत देणे बंधनकारक आहे. वेळेत रक्कम न दिल्यास त्यावर वार्षिक ९ टक्के दराने व्याज द्यावे लागेल. हा वाद कायमचा निकाली काढण्यासाठी आणि कर्मचाऱ्याच्या प्रदीर्घ सेवेचा आदर म्हणून ही नुकसानभरपाई निश्चित करण्यात आली आहे, असेही सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालात स्पष्ट केले.

-------------

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि.५ फेब्रुवारी २०२६


## कन्यादान योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

बीड : सामुहिक विवाह सोहळयास प्रोत्साहन मिळावे या हेतूने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सन २००३-०४ या आर्थिक वर्षापासून कन्यादान योजना लागू करण्यात आलेली आहे. या योजनेची अंमलबजावणी जिल्हास्तरावर सहायक आयुक्त, समाजकल्याण, बीड या कार्यालयामार्फत करण्यात येते.सदर योजनेंतर्गत स्वयंसेवी संस्थामार्फत आयोजित केलेल्या सामुहिक विवाह सोहळयात भाग घेवून विवाह केलेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील दाम्पत्यांना प्रतिदाम्पत्य रु. २०,०००/- इतके अर्थसहाय्य देण्यात येते तसेच असा सामुहिक विवाह सोहळा आयोजित करणा-या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेस प्रतिदाम्पत्य रुपये ४,०००/- इतके अनुदान देण्यात येते. सामूहिक विवाह सोहळयात किमान १० दाम्पत्यांचे विवाह होणे अपेक्षित आहे.

# बीड जिल्हयामध्ये इयत्ता १० वी,१२ वी परीक्षेसाठी कॉपीमुक्त अभियान राबवावे -जिल्हाधिकारी

बीड। प्रतिनिधी

दक्षता समितीची बैठक जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, यांच्या अध्यक्षतेखाली दि.०३ फेब्रुवारी २०२६ रोजी घेण्यात आली. या बैठकीसाठी सर्व समिती सदस्य उपस्थित होते. तसेच दूरदृश्य प्रणालीव्दारे तहसिलदार, गटविकास अधिकारी व गटशिक्षणाधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीत जिल्हाधिकारी यांनी प्रत्येक परीक्षा केंद्रावरील प्रत्येक वर्गखोलीत कैमेरे बसवून ते कार्यान्वयीत करावेत, संवेदनशील परीक्षा केंद्रावर आवाजाचे रेकॉर्डींग होणारे कैमेरे बसवावेत, त्याची तपासणी तहसिलदार, गटविकास अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांनी पुढील दोन दिवसात करावी व त्याचा अहवाल सादर करावा, तसेच कैमे-यांचे अॅक्सेस जिल्हास्तरावर कंट्रोल रुम स्थापन करून तेथे घेण्यात यावेत, संवेदनशील परीक्षा केंद्रावरील आणि ज्या परीक्षा केंद्रातील वर्ग खोलीमध्ये कॅमेरे नसतील, तेथील केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व परीक्षेशी संबंधित इतर कर्मचारी यांची अदलाबदल करावी, परीक्षाकेंद्रावर नियुक्त कर्मचा-या व्यतीरिक्त इतर कर्मचारी तसेच व्यक्तीना प्रवेश देऊ नये, इतर कर्मचारी परीक्षा केंद्रावर आढळल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, परीक्षा केंद्रावर अनुदानित, अंशतः अनुदानित व जिल्हा परिषदेचे शिक्षक व इतर कर्मचारी नेमावेत, परीक्षा केंद्रावरील सर्व कर्मचाऱ्यांसाठी ओळखपत्र अनिवार्य करण्यात यावे, तालुकास्तरावरुन महत्वाच्या पेपरला वर्ग १ च्या अधिकाऱ्यांनी परीक्षा केंद्रांना भेटी द्याव्यात.बीड जिल्हयामध्ये कॉपीमुक्त अभियान राबवून जिल्हा कॉपीमुक्त होण्याच्या दृष्टीने संबधित यंत्रणेने प्रयत्न करावेत, तसेच संवेदनशील परीक्षा केंद्रावर जास्तीत जास्त लक्ष ठेवून परिक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी संबधित अधिकारी. कर्मचा-यानी लक्ष द्यावे असेही श्री. जॉन्सन या प्रसंगी म्हणाले. या बैठकीस संबधित अधिकारी उपस्थित होते. बीड जिल्हयामध्ये मंडळातर्फे उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) फेब्रुवारी मार्च-२०२६ आयोजित केल्या आहेत. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा दि.१०फेब्रुवारी ते दि.१८ मार्च २०२६ आणि माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा दि.२० फेब्रुवारी ते दि.१८ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आल्या आहेत.



फेब्रुवारी/मार्च-२०२६ चे सुयोग्य प्रकारे संचालन व्हावे, परीक्षा केंद्रावर गैरप्रकार होऊ नये यासाठी महाराष्ट्र शासन मुख्य सचिव यांनी दिनांक २७ जानेवारी २०२६ रोजी दूरचित्र प्रणालीव्दारे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधीक्षक तसेच परीक्षेशी संबंधित अधिका-यांची बैठक घेवून सूचना दिलेल्या आहेत. त्यामध्ये जिल्हा स्तरावर दक्षता समितीची बैठकः आयोजीत करून प्रत्येक परीक्षा केंद्रावर कैमेरे बर्साविणे, संवेदनशील परीक्षा केंद्रावरील केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व इतर कर्मचारी यांची अदलाबदल करणे, बैठे पथक व भरारी पथक नियुक्त करणे याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. जिल्हा स्तरावर दक्षता समिती गठीत करण्यात आलेली आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन अध्यक्ष, पोलीस अधिक्षक नवीनीत कॉवत सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी, जितिन रहेमान सदस्य, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण सदस्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य सदस्य, प्राथमिक शिक्षणाधिकारी सदस्य योजना शिक्षणाधिकारी सदस्य, माध्यमिक शिक्षणाधिकारी सदस्य सचिव आहेत. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी दि.२७ जानेवारी २०२६ रोजी दिलेल्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. सर्व गटविकास अधिकारी यांनी जिल्ह्यातील सर्व ग्रामस्तरावर कॉपीमुक्त अभियानाची जनजागृती करावी तसेच गटशिक्षणाधिकारी यांनी सर्व शाळामध्ये मुख्याध्यापक व पालक यांना परीक्षेसंबंधित कॉपीमुक्त अभियानाची माहिती दयावी. आकाशवाणी व इतर प्रसार माध्यमांमध्ये कॉपीमुक्त अभियानाची प्रसिध्दी देण्यात यावी भरारी पथकांनी इंग्रजी, गणित व विज्ञान इत्यादी महत्वाच्या विषयांच्या पेपरच्या दिवशी संवेदनशील केंद्रांना भेटी द्याव्यात. परीक्षेचे चित्रीकरण ड्रोन कॅमेऱ्याद्वारे करावे. पोलीस विभागा मार्फत सर्व परिरक्षक कार्यालय व परीक्षा केंद्रावर पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन देण्यात यावा अशा सूचना त्यांनी दिलेल्या होत्या. परीक्षा केंद्रापासून ५०० मीटर परिसरात झेरॉक्स सेंटर परीक्षा कालावधीत बंद ठेवण्यात येणार आहे, तसेच संबंधित परीक्षा केंद्राच्या परीसरात प्रतिबंधात्मक उपायोजना लागू करण्यात येणार असून परीक्षा केंद्रावर गैर प्रकार घडल्यास गैरप्रकारांना प्रोत्साहीत करणारे, मदत करणारे व प्रत्यक्ष गैरमार्गाचा अवलंब करणाऱ्यांवर दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येणार आहे. जिल्हा दक्षता समितीने इ.१० व १२ वी च्या परीक्षा शांततेत व तणावमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी व विद्यार्थ्यामध्ये गुणवत्ता वाढ होण्याच्या दृष्टीने जिल्हाभर कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबविण्याबाबतच्या उपाययोजना केलेल्या असून मुलांच्या शिक्षणाचा पाया मजबूत होण्यासाठी कॉपीमुक्त अभियान महत्वाची भूमिका असल्याचे जिल्हाधिकारी म्हणाले.

## पिंपळगाव धस माध्यमिक विद्यालयात क्रीडा व सांस्कृतिक पुरस्कारांचा वर्षाव



पाटोदा। प्रतिनिधी

माध्यमिक विद्यालय पिंपळगाव धस येथे आज अत्यंत उत्साही वातावरणात 'वार्षिक क्रीडा व सांस्कृतिक पुरस्कार वितरण सोहळा' संपन्न झाला. वर्षभरात विविध स्पर्धांमध्ये देदीप्यमान कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे मुख्याध्यापक श्री पाखरे सर यांच्या हस्ते सरस्वती पूजनाने झाली. श्रीमती जावळे मॅडम यांनी विद्यार्थ्यांचा वर्षभरातील शालेय प्रगतीचा आणि यशाचा आढावा सांगितला. क्रीडा क्षेत्र: धावणे, खो-खो, क्रिकेट ,रनिंग यांसारख्या मैदानी खेळांमध्ये प्राविण्य मिळवणाऱ्या खेळाडूंना शालेय साहित्य देऊन सन्मानित करण्यात आले.


सांस्कृतिक विभाग: वक्तृत्व, गायन, नृत्य आणि चित्रकला स्पर्धांमधील विजेत्यांना गौरवण्यात आले. विशेष सन्मान: दहावी वर्गातील एक आदर्श विद्यार्थ्यांची निवड करून 'शाळा भूषण' पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला "केवळ पुस्तकी ज्ञान न घेता खेळ आणि कलेच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास करणे काळाची गरज आहे," असे मत शाळेचे ज्येष्ठ शिक्षक श्री मुळीक सर यांनी आपल्या भाषणात व्यक्त केले. विद्यार्थ्यांचा उत्साह पुरस्कार घेताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि अभिमान सोहळ्याची शोभा वाढवत होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीमती जावळे मॅडम यांनी केले.

या सोहळयाबद्दल संस्थेचे अध्यक्ष.श्री.रामकृष्णजी बांगरसाहेब , सौ.सत्यभामाताई बांगर व युवा नेते विजयसिंह बांगर तसेच परिसरातील पालक व ग्रामस्थांनी विद्यालयाचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री.नागरगोजे सर, श्री.बोरखडे सर, श्री.गायकवाड सर , ढाकणे मॅडम, सानप सर, गर्जे सर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाचे योगदान दिले. तर श्री.बांगर सर यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## मांजरसुंबा घाटात शॉर्टसर्किटने कारला आग;पोलिसांमुळे चौघांचे वाचले प्राण

बीड / प्रतिनिधी : तालुक्यातील मांजरसुंबा घाटात धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर वाहतुकीने गरम झालेल्या वायरचे शॉर्ट सर्किट होऊन कारला आग लागली ही आग गंभीर होती, परंतु पोलिसांच्या सतर्कतेमुळे कार मधील चौघांना सुखरूप वाचवण्यात यश आले व नंतर आग विझवून वाहतूक सुरळीत करण्यात आली.

धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर मांजरसुंबा घाटात दिनांक एक फेब्रुवारी रोजी (एम. एच. २२ ए. एम. ५२०३ ) ही सदरील कार गंगाखेड कडे जात असताना मांजरसुंबा घाटात शॉर्टसर्किटने या गाडीला रात्रीच्या वेळी आग लागली या आगीने अचानक रौद्र रूप



धारण केले. महामार्गावर ही आग लागल्याने अनेकांचा थरकाप उडाला मात्र महामार्ग वाहतूक पोलीसांनी लक्ष देऊन कारमधील हितेश खंडागळे व त्यांची पत्नी, दोन मुलांना कारमधून सुखरुप बाहेर काढले. त्यानंतर नागरिकांच्या मदतीने सदरील कार विझवण्यात आली.

नंतर ही कार रोडच्या बाजूला घेऊन वाहतूक सुरळीत करण्यात आली महामार्ग वाहतूक पोलीस यांच्या सतर्कतेमुळे कार मधील पती पत्नी व दोन मुलांना वाचवण्यात यश आले, तसेच वाहतूकही सुरळीत करण्यात आली यासाठी महामार्ग पोलीस दयानंद कांबळे, एएसआय तात्यासाहेब बांगर, बालाजी बाष्टेवाड यांनी घटनास्थळी धाव घेऊन शर्तीचे प्रयत्न केले. या घटनेत कोणतीही जीवित हानी न झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

## शिक्षणाच्या आयचा घो! दांडीबहाद्दर शिक्षकामुळे भैरवनाथ वस्ती शाळेतील विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात

बीड

बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील गलथान कारभारामुळे ग्रामीण भागातील गोरगरिबांच्या मुलांच्या शिक्षणाचा खेळखंडोबा सुरू असल्याचे गंभीर चित्र समोर आले आहे. नुकतेच कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहार प्रकरणात जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी निलंबित झाले असताना, दुसरीकडे काही शिक्षकांच्या बेफिकीर वर्तणुकीमुळे शालेय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचा आरोप पालकांनी केला आहे. बीड तालुक्यातील जरुड केंद्रीय जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंतर्गत भैरवनाथ वस्ती शाळेतील मुख्याध्यापक राजेश देशमुख हे गेल्या १२ वर्षांपासून एकाच ठिकाणी कार्यरत असून, ते नियमितपणे शाळेत गैरहजर राहत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. पालकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित शिक्षक २६ जानेवारी आणि १५ ऑगस्ट रोजी केवळ झेंडावंदनासाठी शाळेत येतात, तर इतर वेळी शाळेकडे फिरकतही नाहीत.



भैरवनाथ वस्ती शाळेत जवळपास १०० लोकसंख्या असून इयत्ता पहिली ते चौथी पर्यंत वर्ग चालतात. मात्र, दुसरी आणि चौथीच्या विद्यार्थ्यांना शिकवण्याची जबाबदारी असलेल्या शिक्षकाच्या गैरहजेरीमुळे पालकांना आपल्या मुलांना २ किलोमीटर अंतरावरील जरूड येथील जिल्हा परिषद शाळेत पाठवावे लागत आहे. महिन्यातून एखाद-दोनदा येऊन हजेरी मस्टरवर सही करून निघून जात असल्याचा आरोप पालक अमोल जाधव यांनी केला आहे. या गंभीर प्रकाराबाबत डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी जिल्हाधिकारी बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. मुख्याध्यापक राजेश देशमुख यांच्या वारंवारच्या गैरहजेरीमुळे विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक नुकसान होत असून, संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. शिक्षणप्रेमी बाळासाहेब मोरे पाटील यांनी शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या अनागोंदी व निष्क्रियतेवर जोरदार टीका केली आहे. "महिन्याला पाऊण लाख रुपये पगार घेणाऱ्या शिक्षकांकडून गोरगरिबांच्या लेकरांचे भविष्य उद्ध्वस्त केले जात आहे. अशा दांडीबहाद्दर शिक्षकांवर कठोर कारवाई करून शिस्त लावणे गरजेचे आहे," अशी मागणी त्यांनी केली. तक्रार प्राप्त झाल्यानंतर दि. ४ बुधवार रोजी विस्तार अधिकारी माटे एस.बी. आणि केंद्रप्रमुख सिद्दीकी एस.ए. यांनी भैरवनाथ वस्ती शाळेला भेट देऊन तपासणी केली. गेल्या आठवड्यात मुख्याध्यापकांच्या हजेरी मस्टरवर स्वाक्षऱ्या नसल्याचे आढळून आले. पालकांशी संवाद साधून संबंधित प्रकरणाचा सविस्तर अहवाल गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे सादर केला जाणार असल्याची माहिती विस्तार अधिकारी माटे यांनी दिली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे भवितव्य धोक्यात येऊ नये, यासाठी संबंधित शिक्षकांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

## डॉ.अजित कुमार यांना आंतरराष्ट्रीय परिषदेत प्रथम क्रमांकाचा सन्मान

### विद्यार्थ्यांसह युवा संशोधकांना विज्ञान व नवकल्पनांची प्रेरणा देणाऱ्या संशोधनाचे जनक

बीड। प्रतिनिधी

शहरातील रामानुजन अॅकॅडमी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी चे संस्थापक व संचालक तसेच आर२ई टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड चे संचालक (संशोधन व नवोपक्रम)असलेले डॉ.अजित कुमार यांनी पर्यावरणीय शाश्वततेसाठी रासायनिक व भौतिक विज्ञानातील आघाडीवरील संशोधन आंतरराष्ट्रीय परिषद (कॅप्सेस२०२६) या आंतरराष्ट्रीय परिषदेत संशोधन पेपर सादरीकरणात प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ही आंतरराष्ट्रीय परिषद ३०व३१ जानेवारी २०२६. एम.एस.पी. मंडळाचे बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, येथे रसायनशास्त्र विभाग यांच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. यात पर्यावरणीय शाश्वततेसाठी रासायनिक व भौतिक विज्ञानातील संशोधनावर आधारित विविध सत्रांमध्ये देश-



विदेशातील संशोधक व प्राध्यापकांनी सहभाग घेतला.

या परिषदेस एम.एस.पी. चे अध्यक्ष आ. प्रकाश सोळंके, सचिव सतीश चव्हाण आणि उपाध्यक्ष अमरसिंह पंडित यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले. आयोजन समितीत डॉ.ए.डी.चिंधे (अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक), प्रा.डॉ.बी.डी.कोकाटे (उपप्राचार्य) आणि प्रा.डॉ.एस.एस.उंदरे (प्राचार्य व मुख्य संयोजक) यांचा समावेश होता. कॅप्सेस २०२६ या परिषदेत सुमारे ३०० संशोधन पेपर्स निवडले गेले होते. या स्पर्धात्मक वातावरणात डॉ. अजित कुमार यांच्या संशोधन कार्याने वैज्ञानिक गुणवत्ता, नवकल्पना आणि व्यावहारिक उपयुक्तता यामुळे विशेष लक्ष वेधले आणि त्यांना संशोधन पेपर सादरीकरणामध्ये प्रथम पारितोषिक मिळाले. मायक्रोवेव्ह अभियांत्रिकी, संश्लेषित अपर्चर रडार, कृत्रिम बुद्धिमत्ता व अनुप्रयुक्त संशोधन या क्षेत्रातील त्यांच्या अनुभवामुळे या यशाने स्थानिक संशोधन क्षेत्राला नवी प्रेरणा मिळाली आहे. पर्यावरणीय आव्हानांना सामोरे जाण्यासाठी तंत्रज्ञान व संशोधन यांचा संगम आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना नमूद केले. कॅप्सेस - २०२६ मधील हा सन्मान त्यांच्या संशोधन प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा असून विद्यार्थ्यांना आणि युवा संशोधकांना विज्ञान व नवकल्पनांच्या दिशेने पुढे जाण्यासाठी प्रेरणा देणारा ठरला आहे.

## सावरकर महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार विभागाची कार्यशाळा



बीड। प्रतिनिधी

येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयामध्ये आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या कार्यशाळेचा समारोप मान्यवरांच्या उपस्थितीत दि. ४ फेब्रुवारी २०२६ रोजी झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून मिलिया महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहम्मद इलियास हे होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे होते. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे, आजीवन शिक्षण व विस्तार विभाग प्रमुख डॉ.देविदास नागरगोजे, यांची उपस्थिती होती. या प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. इलियास म्हणाले की समाजामध्ये आदर्श प्रस्थापित करण्याची जबाबदारी युवकांची आहे.चांगल्या सवयी, चांगल्या कामाची सुरुवात स्वतःपासून केली तर समाज बदलेल. अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुहास मोराळे यांनी सांगितले की आजचा युवक हा आजचाच सुजाण नागरिक आहे. समाजामध्ये बदल घडवण्याची क्षमता युवाशक्तीत आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ अशोक डोके यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. दत्ता पवार यांनी केले तर आभार डॉ. देविदास नागरगोजे यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

cmyk

# जनावरांच्या इअर टॅगच्या अटीने शेतकरी अडचणीत

पुणे। प्रतिनिधी

शेतकऱ्यांकडील सर्व पशुधनाला सरकारने इअर टॅग लावणे आणि त्याची नोंद भारत पशुधन प्रणालीअंतर्गत करणे बंधनकारक केले आहे. मात्र, शेतकऱ्यांना हे लवकर शक्य होणार नाही. सरकारने थेट बंधनच घातल्याने पशुसंवर्धन विभागाकडे एवढे इअर टॅग उपलब्ध असतील का? हा प्रश्न पेरणीवर आला आहे. दरम्यान, वेळेत इअर टॅग न मिळाल्याने शेतकरी, व्यापारी आणि बाजार समित्यांतील जनावरांच्या बाजारात जनावरांची संख्या कमी होऊन मोठी आर्थिक कोंडी होणार आहे.

जनावरांची ओळख पटवणे, आरोग्य ट्रेकिंग करणे आणि खरेदी-विक्री सुलभ करण्यासाठी इअर टॅग बंधनकारक करण्यात आले असून, जनावरांना १२ अंकी युनिक आयडी दिला जाणार आहे. त्यामुळे त्यांची वंशावळ आणि लसीकरणाची माहिती ठेवणे सोपे होणार आहे. त्याचा विचार करून इअर टॅग नसलेल्या पशुधनाची खरेदी- विक्री, वाहतूक, तसेच पशुवैद्यकीय सेवा देण्यास मनाई करण्यात आली आहे. राज्यांतर्गत व राज्याबाहेरील वाहतुकीसाठीही इअर टॅग आणि ऑनलाइन नोंद अनिवार्य आहे.



मात्र, अचानक शेतकऱ्यांना इअर टॅग जनावरांना लावणे शक्य होणार नाही, अशी सद्यःस्थिती आहे. त्यातच टॅग पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत, की नाही याबाबतही साशंकता आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. इअर टॅग नसल्याने त्याचा परिणाम बाजारातील जनावरांच्या उलाढालीवर होणार असून, आठवडी बाजार, जनावरांच्या बाजार समित्या आणि गावपातळीवरील व्यवहारांवर मोठा परिणाम झाला आहे. इअर टॅग असल्याशिवाय जनावरांची विक्री होत नसल्याने आर्थिक अडचणी वाढत आहेत, तर दुसरीकडे इअर टॅग वेळेत न मिळाल्यानेही नुकसानभरपाई, विमा व अन्य शासकीय लाभावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे शेतकरी दुहेरी कोंडीत अडकले आहेत. नैसर्गिक आपत्ती, आजीार किंवा अपघातात मृत्यू झालेल्या पशुधनाबाबतही टॅग नसल्यास भरपाई मिळत नाही. या पार्श्वभूमीवर बाजार समित्यांनी शासनाकडे तातडीने सकारात्मक तोडगा काढण्याची मागणी केली आहे. जोपर्यंत पुरेसे इअर टॅग उपलब्ध होत नाहीत, तोपर्यंत कारवाई स्थगित ठेवावी, बाजार समित्या किंवा अधिकृत यंत्रणांच्या माध्यमातून टॅग उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.

### नकली टॅग लावण्याची भिती

पशुधन नोंदणी, रोगनियंत्रण आणि पारदर्शकतेसाठी इअर टॅगिंग महत्त्वाचे आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना तातडीने टॅग उपलब्ध करून दिले जात नसल्याने बाजारात नकली टॅग उपलब्ध केले जाण्याची भीती आहे. त्यामुळे त्यातून शेतकऱ्यांची फसवणूक होऊ शकते. त्यावर पशुसंवर्धन विभागाने लक्ष ठेवण्याची गरज आहे. अन्यथा शेतकऱ्यांना फसवणुकीला सामोरे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# कोंबड्यांना येणारा ताण; कारणे आणि उपाय

अंतर्गत शारीरिक कार्य सामान्यपणे करण्यासाठी कोंबड्या विविध वर्तणूक आणि चयापचय यंत्रणा वापरते, यालाच कोंबड्यातील ''ताण'' असे म्हणतात. व्यावसायिक कोंबडी पालनातील कोंबड्यांना अशा परिस्थितीचा सामना करावा लागतो. कोंबडीच्या ताणाचा कळपाच्या एकूण आरोग्यावर आणि उत्पादकतेवर लक्षणीय परिणाम होतो. त्यामुळे तणाव निर्माण करणारे घटक समजून घेणे गरजेचे आहे. हे घटक ओळखणे आणि त्यांचे व्यवस्थापन करणे हा यशस्वी पोल्ट्री उत्पादनाचा एक महत्त्वाचा भाग आहे.

कोंबड्यांना ताण येण्याची विविध कारणे :अचानक हवामानातील बदलामुळे कोंबड्यांना ताण येऊ शकतो आणि प्रतिकारशक्ती कमकुवत होऊ शकते आणि ते संवेदनशील बनतात. वेगवेगळ्या कारणांमुळे कोंबड्या पुरेशा प्रमाणात आहार घेत नसतील तर ताण येऊ शकतो. खाद्य, आहारात पुरेशा पोषक तत्वांचा अभाव किंवा इतर घटक यामुळे सुद्धा ताण येतो. वजन वाढणे, कमी होणे किंवा वृद्धत्व यासारख्या घटनांमुळे तणाव निर्माण होतो. कोंबड्यांना पकडताना, विशिष्ट औषधे देताना किंवा एका ठिकाणाहून दुसर्या ठिकाणी नेले जाते, तेव्हा त्यांना भावनिक ताण येतो. रोग बरा करण्यासाठी दिलेल्या औषधांमुळे आणि कालावधीमुळे देखील ताण येऊ शकतो.

कोंबड्यांचे ताण घालवण्यासाठी उपाय योजना : कोंबड्यांमधील ताण घालवण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी प्रत्येक कोंबडीला किती जागा लागते हे पाहून आपल्याजवळील उपलब्ध जागेनुसार एकूण कोंबड्यांची संख्या



ठरवावी. तुमच्याकडे उपलब्ध असलेल्या जागेच्या आधारे कोंबडीची एकूण संख्या निश्चित करा. लहान जागेत जास्त गर्दी केल्याने वातावरणातील अमोनियाचे प्रमाण वाढते. शिवाय पक्षी एकमेकांच्या सानिध्यात असल्याने रोगाचा प्रादुर्भाव लवकर होतो. यावर उपाय म्हणून लिटरची स्वच्छता करावी. पावसाळ्यात आणि जास्त आर्द्रता असताना लिटर कोरडे ठेवावे. वातावरणातील बदलानुसार शेडमध्ये पडदे लावणे, पोती बांधणे या गोष्टींची वेळेवर काळजी घ्यावी. ताण घालवणारे औषधे तज्ज्ञांच्या सल्ल्याने द्यावीत. आहारातून किंवा पाण्यातून जीवनसत्वांचा पुरवठा केल्यास ताण कमी होतो. कोंबड्यांना ताण असताना त्यांना लसीकरण करू नये. प्रथम कोंबड्यांवरील ताण कमी करावा आणि नंतरच लसीकरण करावे.

# आंब्याचे वेळीच करा उपाय अन्यथा होऊ शकते लाखोंचे नुकसान

हिवाळा सुरू झाला की आंब्याच्या झाडांवर मेलीबग्सचे आक्रमण वाढते, त्यामुळे मोहर नीट वाढू शकत नाहीत. अशा परिस्थितीत आंबा उत्पादक शेतकऱ्यांना दरवर्षी मोठा तोटा सहन करावा लागतो. पण आता देशातील ज्येष्ठ फळ शास्त्रज्ञ डॉ. एस.के. सिंह मेलीबग कीटकांना तोंड देण्यासाठी खास उपाय सांगितला आहे. डॉ. सिंग यांच्या म्हणण्यानुसार मेलीबगचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आंब्याच्या झाडांची निगा डिसेंबर महिन्यापासूनच सुरू करावी. मेलीबगच्या नियंत्रणासाठी प्रति झाड २ मिली डाय मिथाइल २० ईसी प्रति लिटर पाण्यात मिसळून द्रावण तयार करा. यानंतर आंब्याच्या फांद्यावर शिंपडा. त्यामुळे झाडावर चढणाऱ्या कीटकांच्या संख्येत मोठी घट होते. पण केमिकल कंट्रोल करताना काही गोष्टीही लक्षात ठेवायला हव्यात.

विशेष म्हणजे मित्र कीटकांनाही यामुळे इजा होते. मित्र कीटक सकाळी जास्त सक्रिय असतात. म्हणूनच कीटकनाशकांची फवारणी संध्याकाळी करावी. या मेलीबग कीटकांमुळे आंबा पिकाचे ५० ते १०० टक्के नुकसान होऊ शकते. हे आंबा पिकामध्ये डिसेंबर ते मे या काळात दिसतात.

असे होते नुकसान :

या किडीची निम्फ आणि प्रौढ मादी दोघेही पिकांचे खूप नुकसान करतात. ते फळांचे देठ, फुले, फळे आणि मऊ डहाळ्यांचा रस शोषून आंब्याचे नुकसान करतात. त्याचे वेळीच व्यवस्थापन केल्यास पिकांचे नुकसान टाळता येते. यासाठी यांत्रिक, जैविक व रासायनिक व्यवस्थापन केल्यास पिकाला किडीच्या हल्ल्यापासून वाचवता येते. दुसरीकडे उन्हाळ्यात फळबागा चांगल्या पद्धतीने नांगरून सोडल्या पाहिजेत. त्यामुळे किडीची मादी व अंडी कडक सूर्यप्रकाशाने नष्ट होतात. डिसेंबर, जानेवारी महिन्यात झाडाच्या मुख्य खोडावर जमिनीपासून एक ते दीड फूट उंचीवर झाडाभोवती ३० सेमी रुंद पॉलिथिन गुंडाळून त्यावर ग्रीस लावा. असे केल्याने कीटक मातीतून झाडावर चढू शकत नाहीत. तसेच, मेलीबग किडीच्या प्रतिबंधासाठी, झाडाभोवती माती कुदळल्यानंतर, प्रति झाड २५० ग्रॅम क्लोरपायरीफॉस पावडर घाला. कोणत्याही परिस्थितीत हे काम डिसेंबरअखेर किंवा जानेवारीपर्यंत करा. असे केल्याने या किडीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात कमी होतो. हे कीटक एकदा झाडावर चढले की, त्याचे व्यवस्थापन करणे फार कठीण होते.



# मका पिकातील वाढत्या तणाचा सोप्या पद्धतीने बंदोबस्त!

मका पिकातील तणाच्या व्यवस्थापनामध्ये यांत्रिक तसेच रासायनिक पद्धतीचा वापर केला जातो. यांत्रिक पद्धतीसाठी विविध यंत्रे आणि मनुष्यबळाची गरज असते. सध्याच्या घडीला शेतकऱ्यांना मजूर मिळणे अवघड होते. सोबत प्रत्येक शेतकऱ्यासाठी यंत्राची सोय करणे सोपे नसते त्यामुळे रासायनिक पद्धतीने तण नियंत्रणावर शेतकऱ्यांचा भर असतो.

रासायनिक पद्धत : मक्यामध्ये रासायनिक तणनाशकांचा वापर करुन तण नियंत्रण करणे ही पद्धत सर्रास वापरली जाते. त्यामुळे मका पिकातील तणासाठी कोणते तणनाशक वापरावे याची माहिती घेतल्यास याचा चांगला फायदा होईल.

अॅट्रॅझीन (५०% डब्ल्यू पी) : ४०० ते ६०० ग्रॅम अॅट्रॅझीन पिकाच्या उगवणीपूर्वी हेक्टरी ५०० ते ६०० लिटर पाण्यातून फवारावे. हे तणनाशक रुंद पानांच्या आणि गवतवर्गीय तणांसाठी उपयुक्त आहे. पेरणीनंतर २४ ते ४८ तासांत जमिनीत ओलावा असताना द्यावे. हे तणनाशक फवारल्यानंतर १० ते १२ दिवस पिकाला पाणी देऊ नये.

२,४-डी अमाईन सॉल्ट (५८ टक्के एस. एल.) : हे तणनाशक पेरणीनंतर ३० ते ४० दिवसांनी शेतात फवारावे. त्यासाठी ३५० मि. ली. प्रति एकर प्रति ४०० लिट या प्रमाणाने त्याची फवारणी करावी. हे तणनाशक रुंद पानांच्या तणांसाठी जसे माठ, काटे, गोखरु, पुनर्नवा, दुधी, लव्हाळा, घोळ अशा तणांसाठी उपयोगी आहे.

टेम्बोट्रीऑन (३४.४ टक्के एस. सी.) : पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी हे तणनाशक फवारावे.



फवारणीमध्ये एका एकरासाठी ११५ मिली तणनाशक पाण्यात मिसळावे. सावा, शिंपी, श्वेत पुनर्नवा या तणांसाठी या तणनाशकाचा वापर होतो.

टोपरामेझॉन(३३.६ टक्के एस. सी.) : पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी एक एकरसाठी ३० मिली टोपरामेझॉन १००-१२० लिटर पाण्यात मिसळून शेतात फवारावे. रुंद पानांच्या गाजर गवत, कुंजर, माठ, फुगा, रेशीमकाटा, बथुवा, कोंबडा (करडू), रान नाचणी, वाघनखी, सावा, गोंदवेल इत्यादी तणांच्या व्यवस्थापनासाठी उपयुक्त आहे.

हॅलोसल्फ्युरॉन मिथाइल (७५ टक्के डब्ल्यू. जी) : पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी लव्हाळा तणाच्या व्यवस्थापनासाठी हॅलोसल्फ्युरॉन मिथाइलचा वापर करावा. ३६ ग्रॅम प्रति एकर या प्रमाणाने या तणनाशकाची पाण्यात मिसळून फवारणी करावी.

मेसोट्रिऑन (२.२७ टक्के) अधिक अॅट्रॅझीन (२२.७ टक्के एससी) : हे संयुक्त तणनाशक पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी फवारावे. हे संयुक्त तणनाशक १४०० मिली प्रति एकरसाठी पाण्यात मिसळून फवारावे. रुंद पानांच्या श्वेत पुनर्नवा, लव्हाळा, सावा, वाघनखी, इत्यादी तणांच्या व्यवस्थापनासाठी त्याचा वापर करावा.

टॉप्रामेझोन (१० टक्के) अधिक अॅट्रॅझीन्? (३० टक्के एससी) : हे संयुक्त तणनाशक एक एकरसाठी १००० मिली या प्रमाणाने पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांत फवारावे. रुंद पानांच्या गाजर गवत, माठ, कोंबडा, रान मेथी, रेशीमकाटा आणि वाघनखी या मक्यातील प्रमुख तणांवर त्याची फवारणी करावी.

तणनाशके फवारतांना घ्यावयाची काळजी : तणनाशक फवारणीपूर्वी त्यावरील माहिती व्यवस्थितपणे वाचून घ्यावी. जमीनीवर तणनाशकाची फवारणी करण्यापूर्वी मातीमध्ये ओलावा असल्याची खात्री करावी. तणनाशकाची फवारणी वारा शांत असताना करावी. वाऱ्याच्या उलट दिशेने फवारणी करु नये. फवारणी पंपासाठी शिफारशीनुसारच नोझलचा वापर करावा. तणनाशके पाण्यात मिसळताना लाकडी काठीचा वापर करावा. शिवाय फवारणी करताना तणनाशक तळाशी बसू नये म्हणून ढवळून घ्यावे किंवा पंप हलवून घेणे. फवारणी करताना काही खाऊ नये, धूम्रपान करणे, डोळे चोळणे टाळावे. तणनाशकांच्या फवारणीसाठी स्वच्छ पाण्याचा वापर करावा, गढून पाणी वापरु नये. तणनाशक फवारणीसाठी साधारणत: स्वतंत्रपंप असावा. तणनाशक खरेदी करण्यापूर्वी ज्या पिकासाठी ते वापरणार आहात त्या पिकाचा लेबल क्लेम आहे याची खात्री करावी. तणनाशकाची हाताळणी काळजीपूर्वक करावी. हातमोजे, मास्क, गॉगल, गम बुट घालून फवारणीला सुरुवात करावी. तणनाशकाला खाद्यपदार्थ आणि लहान मुलांपासून दूर ठेवावे. शेतामध्ये तणनाशकाचे विघटन चांगल्या आणि जलद पद्धतीने होण्यासाठी पिकाला सेंद्रीय खते द्यावी. सेंद्रीय खते मातीतील तणनाशकांचे अंश धरुन ठेवतात, सोबत सूक्ष्मजीवांचे प्रमाणही वाढते जे तणनाशकाच्या विघटनाला उपयुक्त ठरते.




## महत्वाच्या घटना

१६६५ : शिवाजी महाराजांनी सूर्यग्रहणाच्या निमित्ताने राजमाता जिजाऊ व सोनोपंत विश्वनाथ डबीर यांची सुवर्णतुला केली. श्री क्षेत्र महाबळेश्वर येथील देवळासमोर ही सुवर्णतुला झाली.
१६७३ : कोंडाजी फर्जंद यांनी अवघ्या ६० मावळ्यांनिशी पन्हाळा जिंकुन महाराजांचे १३ वर्षे अपुर्ण असलेले स्वप्न पूर्ण केले.
१८३२ : पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांनी इंग्रजी व मराठीतील पहिले साप्ताहिक वृत्तपत्र 'दर्पण' सुरू केले.
१८३८ : सॅम्युअल मॉर्स यांनी तारयंत्राचा शोध लावला.
१९०७ : मारिया माँटेसरी यांनी पहिली माँटेसरी शाळा सुरूकेली. त्यांच्या शाळांमुळे पूर्वप्राथमिक शिक्षणात आमूलाग्र बदल झाला.
१९१२ : न्यू मेक्सिको हे अमेरिकेचे ४७ वे राज्य बनले.
१९२४ : राजकारणात भाग न घेणे व रत्नागिरी जिल्ह्यातच राहणे या अटींवर स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जन्मठेपेतुन सशर्त मुक्तता
१९२९ : गोरगरिब व रुग्णांची सेवा करण्यासाठी मदर तेरेसा यांचे कोलकाता येथे आगमन
१९४४ : दुसरे महायुद्ध रशियन सैन्य पोलंडमध्ये शिरले.
१९४६ : आजच्या दिवशी विएतनाम येथे पहिल्या सार्वत्रिक निवडणूका घेण्यात आल्या.
१९८९ : केहर सिंह आणि सतवंत सिंह यांना इंदिरा गांधींच्या हत्या करण्याच्या गुन्हात फाशीची शिक्षा देण्यात आली.
१९९४ : सिडनी टेस्ट सामन्यात दक्षिण आफ्रिकेच्या टीम ने ऑस्ट्रेलिया च्या टीम ला ५ रन नी हरविले.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४१२ : फ्रान्सला परकीय जोखडातून मुक्त करणार्या 'जोन ऑफ आर्क'चा जन्म. तिला चेटकीण ठरवून जाळण्यात आले. नंतर मात्र तिला संत ठरवले गेले. ती 'द मेड ऑफ ऑर्लिन्स' या टोपणनावानेही ओळखली जाते. (मृत्यू: ३० मे १४३१)
१७४५ : बलूनच्यासहाय्याने आकाशात उडण्याचे प्रयोग करणाऱ्या जाक्वास एलियन माँटगोल्फिएर यांचा जन्म.
१८१२ : बाळशास्त्री जांभेकर मराठी पत्रकारितेचे पितामह, १८३२ मधे 'दर्पण' हे वृत्तपत्र काढून त्यांनी वृत्तपत्र व्यवसायाचा पाया घातला. 'दिग्दर्शन' हे मराठीतील पहिले मासिकही त्यांनीच १८४० मधे सुरू केले. (मृत्यू: १८ मे १८४६)
१८२२ : उत्खनन करून ट्रॉय आणि मायसेनी या नगरीचा शोध लावणाऱ्या हेन्रीचा श्लीमन यांचा जन्म.
१८६८ : गणेश दत्तात्रय सहस्रबुद्धे उर्फ 'दासगणू महाराज' आधुनिक संतकवी, 'भक्तिरसामृत', 'भक्तकथामृत' आणि 'संतकथामृत' हे त्यांचे संतचरित्रात्मक ग्रंथ आहेत. (मृत्यू: २५ नोव्हेंबर १९६२)
१८८३ : खलील जिब्रान लेबनॉनमधे जन्मलेले अमेरिकन कवी, लेखक व कलाकार (मृत्यू: १० एप्रिल १९३१)
१९१० : ला प्रसिद्ध भारतीय गायक जी. एन. बालासुब्रमनियम यांचा जन्म.
१९१८ : ला भारतीय प्रसिद्ध गायक भारत व्यास यांचा जन्म.
१९२५ : रमेश मंत्री प्रवासवर्णनकार, कथाकार, विनोदी लेखक (मृत्यू: १९ जून १९९८)
१९२८ : नाटककार, चित्रपटकथालेखक, पत्रकार व साहित्यिक विजय तेंडुलकर यांचा जन्म. (मृत्यू: १९ मे २००८ पुणे, महाराष्ट्र)
१९३१ : डॉ. आर. डी. देशपांडे पर्यावरण क्षेत्रातील शा'स्त्रज्ञ, 'महाराष्ट्र असोसिएशन फॉर द कल्टिव्हेशन ऑफ सायन्स'चे (आघारकर रिसर्च इन्स्टिट्युट) अध्यक्ष
१९४० : प्रसिद्ध भारतीय लेखक नरेंद्र कोहली यांचा जन्म.
१९४९ : परमवीर चक्राने सन्मानित सुभेदार बाना सिंग यांचा जन्म.
१९५५ : रोवान अॅटकिन्सन विनोदी अभिनेते व पटकथालेखक
१९५९ : कपिल देव निखंज भारतीय क्रिकेटकप्तान, समालोचक व प्रशिक्षक
१९६५ : हिमाचल प्रदेश चे १४ वे मुख्यमंत्री जय राम ठाकूर यांचा जन्म.
१९६७ : ऑस्कर पुरस्कार विजेते जगप्रसिद्ध गायक ए. आर. रेहमान यांचा जन्म.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७९६ : जिवबा दादा बक्षी महादजी शिंदे यांचे सेनापती, मुत्सद्दी (जन्म:)
१८४७ : त्यागराज दाक्षिणात्य संगीतकार (जन्म: ४ मे १७६७)
१८५२ : लुई ब्रेल अंधांना उपयोगी पडणाऱ्या ब्रेल लिपीचे जनक व शिक्षक (जन्म: ४ जानेवारी १८०९)
१८८४ : ग्रेगोर मेंडेल जनुकांची संकल्पना मांडणारा जर्मन जीवशास्त्रज्ञ (जन्म: २० जुलै १८२२)
१८८५ : भारतेंदू हरिश्चंद्र आधुनिक हिन्दी साहित्याचे जनक मानले जाणारे हिन्दी साहित्यिक, १८५० ते १९०० हा काळ हिन्दी साहित्यात 'भारतेंदू काळ' म्हणून ओळखला जातो. (जन्म: ९ सप्टेंबर १८५०)
१९१८ : जी. कँटर जर्मन गणितज्ञ (जन्म: ३ मार्च १८४५)
१९१९ : थिओडोर रुझव्हेल्ट अमेरिकेचे २६ वे राष्ट्राध्यक्ष, नोबेल पारितोषिक विजेते (जन्म: २७ आक्टोबर १८५८)
१९७१ : प्रफुल्लचंद्र तथा पी. सी. सरकार जादूगार (जन्म: २३ फेब्रुवारी १९१३)
१९८१ : ए. जे. क्रोनिन स्कॉटिश लेखक (जन्म: १९ जुलै १८९६)
१९८४ : 'विद्यानिधी' सिद्धेश्वरशास्त्री विष्णू चित्राव महामहोपाध्याय, वैदिक साहित्याचे अभ्यासक व मराठी कोशकार (जन्म: १ फेब्रुवारी १८८४)
२००८ : भारतीय ऑर्थोपेडिक सर्जन प्रमोद करन सेठी यांचे निधन.
२००९ : जम्मू काश्मीर चे माजी मुख्यमंत्री गुलाम मोहम्मद शाह यांचे निधन.
२०१० : प्रल्हाद ईरबाजी सोनकांबळे लेखक व इंग्रजीचे प्राध्यापक (जन्म: १६ जुलै १९४३)
२०१७ : भारतीय अभिनेता ओम पुरी यांचे निधन.

cmyk



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



गुरुवार दि.५ फेब्रुवारी २०२६ | ५

# नाशिक-चेन्नई सहा पदरी ग्रीनफील्डचा पहिला टप्पा नाशिक-अहिल्यानगर

## अहिल्यानगर-सोलापूर-अक्कलकोट प्रवासाचा ४ तासांचा वेळ २०२९ पासून २ तासांवर येणार

अहिल्यानगर । प्रतिनिधी

अहिल्यानगर शहराजवळून जाणारा नाशिक-सोलापूर-अक्कलकोट हा ६ पदरी ग्रीन ''फील्ड' कर्नाटक मार्गे चेन्नईला जाणार आहे. महाराष्ट्रातील नाशिक ते अहिल्यानगर व अहिल्यानगर ते सोलापूर अशा दोन टप्प्यात हा प्रकल्प पूर्ण होणार आहे. पहिल्या टप्प्यात नाशिक ते अहिल्यानगर हे काम पूर्ण होणार आहे. २०२३ पासून हा प्रकल्प थांबवण्यात आला होता, आता मात्र केंद्र सरकारने या प्रकल्पाला मंजुरी दिल्याने या ग्रीन फिल्डचा पुढचा मार्ग मोकळा झाला आहे. पहिल्या टप्प्यात संगमनेर तालुक्यातील चौरकवठे येथून या ग्रीनफिल्डच्या कामाला सुरुवात होणार आहे. तत्पूर्वी मार्च महिन्यात शेतकऱ्यांना मोबदला वाटप केला जाणार आहे. त्यासाठी महसूल प्रशासनाकडून सुरू झालेली भूसंपादनाची प्रक्रिया आता अंतिम टप्प्यात आली आहे.



नाशिक -चेन्नई (पूर्वीचे नाव सुरत- चेन्नई) हा ग्रीनफिल्ड' अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यातील अन्य चार तालुक्यांतून जाणार आहे. १४० किमीचे जिल्ह्यातील या ग्रीनफील्ड'चे अंतर आहे. २०२३ मध्ये सुरत- चेन्नई जुने नाव असलेल्या या ग्रीन फील्ड साठी भूसंपादनाची प्रक्रियादेखील सुरू झाली होती. भारत माला योजनेतून हा प्रकल्पपूर्ण करण्यात येणार होता. मात्र भारतमाला योजनेला मुदतवाढ न मिळाल्याने हा प्रकल्प थांबला होता. त्यानंतर महिन्याभरापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आर्थिक घडामोडींच्या मंत्रिमंडळ समितीने १९ हजार १४२ कोटीच्या खर्चाच्या नाशिक-अक्कलकोट प्रकल्पाला मंजुरी दिली. त्यामुळे गेल्या तीन वर्षापासून लांबणीवर पडलेला हा प्रकल्प पुन्हा मार्गी लागला आहे. आहिल्यानगर जिल्ह्यात मार्च अखेरपर्यंत या प्रकल्पाचे भूसंपादन केले जाणार आहे. अंदाजे या प्रकल्पाची किंमत अहिल्यानगर जिल्ह्यातील १० हजार कोटींची आहे. या प्रकल्पामुळे अहिल्यानगर -सोलापूर-अक्कलकोट या प्रवासाची सध्या असलेली ४ तासांची वेळ २०२९ पासून २ तासांवर येणार आहे. सध्या अक्कलकोटला जाण्यासाठी ४ तास लागतात.

केंद्र सरकारचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. यामुळे नाशिक अहिल्यानगर व सोलापूर हे जिल्हे दक्षिण भारतातील चेन्नईसह अन्य जिल्ह्यांना जोडले जाणार आहे. हा सहा पदरी ग्रीनफील्ड असल्यामुळे या तीन जिल्ह्यातील शेतीमाल दक्षिण भारतात घेऊन जाणे सोपे होणार आहे. सध्या असलेल्या मार्गावर प्रवाशांचा जाणारा वेळ हाग्रीनफिल्ड पूर्ण झाल्यानंतर कमी होईल.विशेष करून हा ग्रीनफिल्ड नंतर समृद्धीला जोडला जाणार असल्यामुळे नागपूर व मुंबईहा प्रवास थेट होणार आहे. नाशिक -अक्कलकोट ग्रीनफील्ड साठी महसूल विभागाकडून ८० जमिनीचा ताबा मिळाल्यानंतरच या प्रकल्पाला वेग येणार आहे.नाशिक, सोलापूर असे दोन झोन केंद्र सरकारने तयार केले असून, या दोन झोनमार्फतच शेतकऱ्यांना मोबदला दिला जाणार आहे. दोन टप्प्यात हा प्रकल्प पूर्ण केला जाणार आहे. जमिनीचा ताबा मिळाल्यानंतर पुढच्या ३ महिन्यात प्रत्यक्षात या कामाला सुरुवात केली जाईल. -अमरीश मानकर, प्रभारी महाप्रबंधक,राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, अहिल्यानगर नाशिक-अक्कलकोट ग्रीन फील्डचे ९० टक्के भूसंपादन महसूल विभागाकडून १५ मार्चपर्यंत पूर्ण केले जाणार आहे. दोन वर्षांपूर्वी काही अडचणीमुळे केंद्र सरकारने काही गावाच्या भूसंपादनाला स्थगिती दिली होती. तीन ते चार गावे वगळता उर्वरित गावातील जमिनीचे भूसंपादन करण्याचे काम सुरू आहे.

# संभाजीनगर पाटील गल्लीतील पाणी,स्वच्छताचा प्रश्न मार्गी लावला - भास्कर दानवे



जालना

जालना शहर महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक १ मधून भारतीय जनता पार्टीचे पाचही नगरसेवक भरघोष मतांनी निवडून आल्याबद्दल संभाजीनगर पाटील गल्ली येथे पाटील गल्ली मित्र मंडळाच्या वतीने भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

हा कार्यक्रम नागरिकांच्या मोठ्या उपस्थितीत व उत्साही वातावरणात पार पडला. या कार्यक्रमात नवनिर्वाचित नगरसेवक श्री. भास्कर आबा दानवे, सौ. सुशिला भास्करराव दानवे, सौ. पद्मा अजित मानधानी, सौ. ज्योती रवि साले व श्री. कल्याण जगदीश भदनेकर यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी नगरसेवक श्री. भास्कर आबा दानवे यांनी उपस्थित नागरिकांशी संवाद साधताना सांगितले की, पाटील गल्ली परिसरातील प्रलंबित व आवश्यक विकासकामे येणाऱ्या काळात प्राधान्याने पूर्ण करण्यात येतील. तसेच नागरिकांच्या दैनंदिन गरजांचा विचार करता, इथून पुढे गल्लीमध्ये दर तीन दिवसांनी नियमित पाणीपुरवठा करण्यात येईल व घंटा गाडी सेवा देखील नियमितपणे सुरू राहील, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. या सत्कार सोहळ्यास श्री. भरत पाचफुले, ॲड. धामणगावकर, श्री. राहुल कंटाळे, श्री. सचिन कंटाळे, श्री. रवी तुरे, श्री. प्रदीप गव्हाड, श्री. अमित तातेड, श्री. गोपाल नन्नवरे, श्री. सतीश नाईकवाडे, श्री. रोहित माधवले तसेच पाटील गल्ली मित्र मंडळाचे पदाधिकारी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दीपोत्सवाने उजळली प्रवरामाई, जयघोषाने परिसर दुमदुमला

## संत महंतांच्या उपस्थितीत अमृतवाहिनी प्रवरामाईच्या महाआरतीला प्रतिसाद

नेवासे । प्रतिनिधी

नेवासे नगरीचे ग्रामदैवत श्री मोहिनीराज यात्रोत्सवानिमित्त गुरुवर्य भास्करगिरीजी महाराजांच्या उपस्थितीत सोमवारी सायंकाळी ७ ते ८ यावेळेत झालेल्या अमृतवाहिनी प्रवरामाईच्या महाआरती सोहळ्याला संत-महंतांसह हजारो भाविकांनी हजेरी लावून प्रतिसाद दिला. गंगा गोदावरी माता की जय, अमृतवाहिनी प्रवरामाता की जय च्या गजराने येथील परिसर दुमदूमला होता. तर यावेळी झालेल्या दीपोत्सवाने प्रवरामाई उजळून निघाली होती.



नेवासे येथील गणपती घाटावर श्री मोहिनीराज यात्रा कमिटीच्या वतीने महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी झालेल्या अमृतवाहिनी प्रवरामाईच्या आरती सोहळयाला देवगड गुरूदेव दत्त पिठाचे प्रमुख महंत राष्ट्रसंत गुरुवर्य भास्करगिरी महाराज,सद्गुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे महंत उद्धव महाराज मंडलिक, त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत रमेशानंदगिरीजी महाराज, नेवासा येथील रामकृष्ण विवेकानंद आश्रमाचे प्रमुख बालब्रम्हचारी ज्ञानेश्वर महाराज,घोगरगाव आश्रमाचे बालब्रम्हचारी विश्वनाथ महाराज, गहिनीनाथ महाराज आढाव,चक्रधर स्वामी आश्रमाचे महंत धनंजय मुनी महाराज, बाळू महाराज कानडे,हरी महाराज भोगे, पोलिस निरीक्षक महेश पाटील यांच्या हस्ते वेदमंत्राच्या जयघोषात गंगा पूजन करण्यात आले. गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराजांच्या हस्ते प्रवरामाईला साडी चोळी अर्पण करण्यात आली.

यावेळी तबलावादक कृष्णा कुलकर्णी यांनी झालेल्या भजन प्रसंगी उत्कृष्ट संगीत साथ दिली.गंगा आरतीच्या झालेल्या धार्मिक कार्यक्रमाचे पौरोहित्य वेदशास्त्रसंपन्न युवा पुरोहित निखिलगुरू जोशी, अभिजित बडवे, मयूर जोशी, लक्ष्मीकांत जोशी यांनी केले. या गंगा आरती सोहळ्याला नेवासे बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील, नगरपंचायतचे नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, उपनगराध्यक्ष ॲड. संजय सुखदान, श्री मोहिनीराज मंदिर देवस्थानचे अध्यक्ष जयेश बडवे, बाळासाहेब पाटील, रविंद्र जोशी, जयवंत देवचक्के तसेच नगरसेवक, यात्रा कमिटीचे सदस्य व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन ॲड. मयूर वाखुरे यांनी केले. धार्मिक उपक्रमांमुळे देशाची ताकद, संस्कार वृद्धिंगत अमृतवाहिनी प्रवरामाईची आरती हरिद्वारसारखे दृश्य निर्माण करणारी आहे. अशा धार्मिक उपक्रमांमुळे देशाची खरी शान, ताकद व संस्कार वृद्धिंगत होतात,'' असे मत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांनी व्यक्त केले. गंगा आरती सोहळयासाठी नाशिक येथील गंगा-गोदावरी पंचकोटी आरती समूहातील आचार्य वेदमूर्ती अमित पंचभैय्ये,अलोक गायधनी,शेखर शुक्ल,सदानंद देव,गौरव पंचभैय्ये,पुष्कराज जोशी,शुभम भालेराव गंगापूजन व आरती सोहळयाला उपस्थिती होती.

# दोन्ही कालव्यांतून दुसरी पाणीपाळी ;रब्बीचे दीड लाख हेक्टर ओलिताखाली

## गहू, हरभरा आणि उसाच्या क्षेत्रात वाढ, विहिरींत पाणी वाढले

पैठण । प्रतिनिधी

पैठण जायकवाडी धरणात सध्या ९५ टक्के पाणीसाठा आहे. धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्यातून मागील दीड महिन्यापासून रब्बी हंगामासाठी पाणी सुरू आहे. त्यामुळे गहू व उसाचे क्षेत्र वाढले आहे. उन्हाळ्यादरम्यान आणखी एक पाणी पाळी रब्बीसाठी देण्यात येणार असल्याचे कार्यकारी अभियंता प्रशांत संत यांनी सांगितले. छत्रपती संभाजीनगर, जालना व परभणी जिल्ह्यातील सुमारे १ लाख ४१ हजार ६४० हेक्टर सिंचन क्षेत्राला फायदा होत आहे, अशी माहिती कार्यकारी अभियंता प्रशांत संत यांनी दिली.

मागील दीड महिन्यापासून कालव्यात पाणी सोडल्याने विहिरींमध्ये पाण्याची आवक वाढली आहे. एक पाणीपाळी २१ दिवस चालते. अतिवृष्टीमुळे यंदा खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले होते. त्यामुळे शेतकऱ्यांची आस आता रब्बीच्या पिकावर आहे. रब्बीचा पेरा वाढला आहे. सध्या कालव्या लगत गव्हाच्या क्षेत्रात प्रचंड वाढ झाली आहे.

उसाची लागवड वाढली असल्याचे तालुका कृषी अधिकारी विकास पाटील यांनी सांगितले. पैठण । डाव्या कालव्यातून सध्या सुरू असलेले पाणी. छाया : रमेश शेळके. तीन पाणीपाळी सोडण्याचे प्रशासनाचे आहे नियोजन विहिरींची पातळी वाढणार उन्हाळ्यातही मुबलक पाणी द्यावे : शेतकरी कातपूरचे शेतकरी दीपक मोरे यांनी सांगितले की, जायकवाडी धरणातून यंदा मुबलक पाणी मिळत असल्याने शेतकऱ्यांत आनंद आहे. या पाण्यामुळे आमचे पिक दमदार आले आहेत. उन्हाळ्यात देखील मुबलक पाणी देण्यात यावे. धरणातून ३०० क्युसेकने पाणी सुरू जायकवाडी धरणाचा डावा कालवा २०८ किलोमीटर, तर उजवा कालवा १३२ किलोमीटर लांबीचा असून मराठवाड्यातील शेतीसाठी हा पाणीस्रोत जीवनवाहिनी ठरत आहे, सध्या दोन्ही कालव्यातून ३०० क्युसेकने पाणी सुरू आहे. प्रशांत संत, अभियंता पाटबंधारे विभाग सध्या जायकवाडीच्या दोन्ही कालव्यातून पाणी सोडले जात आहे, आणखी एक पाणी पाळी रब्बीसाठी असणार आहे व उन्हाळ्यात एक पाणी पाळी देण्यात येईल. यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळत असून या पाण्याचा योग्य वापर करावा. विहिरींच्या पाणी पातळीत वाढ होणार आहे. डाव्या कालव्यातून १ लाख ४१ हजार ६४० हेक्टर, तर उजव्या कालव्यातून ४१ हजार ६८२ हेक्टर, असे एकूण १ लाख ८३ हजार ३२२ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येते. यंदा रब्बी हंगामासाठी तीन पाणीपाळी सोडण्याचे नियोजन असून सध्या दुसरी पाळी सुरू आहे. यामुळे रब्बी पिके दमदार आली आहेत.

# गोळेगाव येथील तारादेवी यात्रा उत्साहात; भाविकांची प्रचंड गर्दी

उंडणगाव । प्रतिनिधी

गोळेगाव (ता. सिल्लोड) येथील श्री तारादेवीची वार्षिक यात्रा भक्तीमय वातावरणात पार पडली. दोन दिवस चाललेल्या या यात्रेला हजारो भाविकांनी हजेरी लावली. गावात उत्सवाचे वातावरण होते. सोमवारी दुपारी तीन वाजता देवीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. परंपरेनुसार गोळेगाव खुर्द व गोळेगाव बुर्द या दोन्ही गावांत वगदी काढण्यात आली. गोळेगाव खुर्दला वगदी मिरवणुकीचा मान देण्यात आला. त्यानंतर दोन्ही गावांच्या मिरवणुका एकत्र आल्या. तारादेवी मंदिरास तीन प्रदक्षिणा घालण्यात आल्या.

मिरवणुकीदरम्यान रेवड्या व फुलांची उधळण झाली. मंदिर परिसरात हजारो नारळांची विक्री झाली. यात्रेच्या निमित्ताने गावात मोठी गर्दी झाली होती. सोमवारी वगदीनंतर यात्रेची सांगता झाली. या यात्रेला जिल्हा परिषद, पंचायत समितीचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते. ही यात्रा पारंपरिक पद्धतीने साजरी केली जाते. बदलत्या काळातही परंपरा जपली गेली आहे. ग्रामस्थांनी यात्रेच्या चालीरीतींमध्ये कोणताही बदल होऊ दिलेला नाही. वगदीसाठी गोळेगावसह खंडाळा, बोदवड, धोत्रा, पानवडोद, उंडणगाव, लिहा खेडी, पानस आदी गावांतून भाविक आले होते. यात्रेदरम्यान विविध धार्मिक विधी, अभिषेक व आरती कार्यक्रम पार पडले. भाविकांनी देवीच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच रांगा लावल्या होत्या. मंदिर परिसरात फुलांच्या व विद्युत रोषणाईने सजावट करण्यात आली होती. यात्रेच्या काळात लहान-मोठ्या व्यावसायिकांनी दुकाने थाटली असून खेळणी, मिठाई व खाद्यपदार्थांची रेलचेल होती. ग्रामपंचायत व स्वयंसेवकांनी स्वच्छता, पाणीपुरवठा व वाहतूक व्यवस्थेसाठी विशेष नियोजन केले होते. यात्रेमुळे गावातील सामाजिक एकोपा व भक्तीभाव अधिक दृढ झाल्याची भावना ग्रामस्थ व परिसरातील भाविकांनी व्यक्त केली. यात्रेमध्ये रेवड्या उधळण्याची धार्मिक परंपरा रेवड्या उधळण्याची परंपरा आजही धार्मिक विधी म्हणून साजरी केली जाते.

# शनैश्वर देवस्थानच्या ऑनलाईन दर्शन ॲप संदर्भात नेवासा न्यायालयात दोषारोपपत्र दाखल

अहिल्यानगर । प्रतिनिधी

शनिशिंगणापूर येथील श्री शनैश्वर देवस्थानच्या ऑनलाईन दर्शन ॲप संदर्भातील अपहार प्रकरणी येथील सायबर पोलिसांनी नेवासा न्यायालयात नऊ संशयित आरोपींविरूध्द सुमारे अडीच हजार पानी दोषारोपपत्र दाखल केले आहे. या प्रकरणात सुमारे ७७ लाख रूपयांचा अपहार झाल्याचे दोषारोपपत्रात नमूद करण्यात आले आहे. भाविकांच्या सेवेसाठी सुरू करण्यात आलेल्या ऑनलाईन दर्शन ॲपच्या करारामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचे तपासात उघड झाले आहे. संशयित आरोपींनी देवस्थानच्या निधीचा स्वतःच्या फायद्यासाठी वापर करून देवस्थानची फसवणूक केल्याचा आरोप दोषारोपपत्रात करण्यात आला आहे.





शनैश्वर देवस्थानच्या ऑनलाईन दर्शन ॲपमध्ये गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी पोलिसांकडे प्राप्त झाल्या होत्या. राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनात आमदार विठ्ठलराव लंघे यांनी या ॲप करारातील संशयास्पद व्यवहारांचा मुद्दा उपस्थित केला होता. या मुद्द्याची गंभीर दखल घेत गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित प्रकरणात गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. तथापि, कोणताही तक्रारदार पुढे न आल्याने पोलिसांनी स्वतः फिर्यादी होत शनिशिंगणापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. त्यानंतर या गुन्ह्याचा तपास सायबर पोलिसांकडे वर्ग करण्यात आला. सायबर पोलिसांनी देवस्थानचे विश्वस्त, अधिकारी, कर्मचारी तसेच ॲप मालक यांचे जबाब नोंदविले. विविध बँक खात्यांची तपासणी करून अपहारासंदर्भातील कागदोपत्री पुरावे गोळा करण्यात आले. या प्रकरणात सुमारे ५०० कोटी रूपयांचा अपहार झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. मात्र सखोल तपासानंतर पोलिसांनी दोषारोपपत्रात ७७ लाख रूपयांचा अपहार झाल्याचे स्पष्ट केले आहे. प्रकरण गाजल्यानंतर सायबर पोलिसांनी तपासाला गती देत देवस्थानचे कर्मचारी संजय पवार व सचिन शेटे यांना अटक केली. ते सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. तपासादरम्यान ॲप मालकांनी करारानुसार देवस्थानच्या खात्यात जमा करावयाची रक्कम थेट काही कर्मचार्यांच्या वैयक्तिक बँक खात्यात जमा केल्याचे निष्पन्न झाले. यानंतर सायबर पोलिसांनी ॲप मालकांना नोटीस बजावून चौकशीसाठी हजर राहण्याचे आदेश दिले. त्यांना देखील या गुन्ह्यात आरोपी करण्यात आले आहे. या घोटाळ्यात ॲप मालक, देवस्थानचे अधिकारी व कर्मचारी यांचा सहभाग असल्याचे तपासात स्पष्ट झाले असून एकूण नऊ संशयित आरोपी निष्पन्न झाले आहेत. त्यापैकी दोघांना अटक करण्यात आली आहे. देवस्थानचे तत्कालीन कार्यकारी अधिकारी नितीन शेटे मयत झाले आहे.

या आरोपिंविरोधात दोषारोप दाखल

अटकेतील संजय तुळशीराम पवार (रा. सोनई), सचिन अशोक शेटे (रा. शनिशिंगणापूर) यांच्यासह नितीन सुर्यभान शेटे (मयत), उज्वल निरंज भट्टाचार्य (पश्चिम बंगाल), वरूण दत्तात्रय पाठक (रा. बनपिंप्री, ता. श्रीगोंदा), विभू जयप्रकाश अग्रवाल (रा. लखनऊ), शालिनी भारत जैयस्वाल (रा. मुंबई), सचिन रावसाहेब बनकर (रा. शनिशिंगणापूर), गोरक्ष केरूजी दरंदले (रा. शनिशिंगणापूर) यांच्याविरूध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

# जोशी कुटुंबाकडून गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा

खंडाळा । प्रतिनिधी

खंडाळा गावचे पहिले सरपंच कै. एकनाथराव जोशी यांच्या स्मरणार्थ डॉ. अरुण जोशी यांच्या वतीने शाळेच्या नावे एफडी काढण्यात आली आहे. या एफडीवर मिळणाऱ्या व्याजातून गेल्या पाच वर्षांपासून दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांना आजीवन बक्षिसे दिली जातात. मार्च २०२५ मध्ये झालेल्या एसएससी परीक्षेत खंडाळा केंद्रात श्रेया कमलेश पवार हिला प्रथम क्रमांक मिळाला.



तिला ४०१ रुपयांचे बक्षीस देण्यात आले. प्राची नवनाथ वेळंजकर हिला द्वितीय क्रमांकासाठी ३०१ रुपये, तर ईश्वरी ज्ञानेश्वर बहाळस्कर हिला तृतीय क्रमांकासाठी १०१ रुपयांचे बक्षीस मिळाले. बक्षीस वितरण सोहळ्यात प्रशालेचे मुख्याध्यापक अल्लाउद्दीन शेख, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष एस. एस. बागुल, उपाध्यक्ष शफिक शेख, मेजर मिलिंद बागुल, केंद्रप्रमुख बबनराव तगरे, मुख्याध्यापक मनोज गव्हाणे, मुख्याध्यापक सुनिल प्रधान आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

या वेळी सुरेश बर्डे, ईश्वर खेडकर, कल्पना गवारे, मनीषा कुमावत, रेखा भालेकर, आसाराम जाधव, गोविंद त्रिभुवन, ज्ञानेश्वर बहाळस्कर, अशोक दारवंटे, विक्रम पठारे, भास्कर घायवट, जोशना बकाल आणि विद्यार्थी उपस्थित होते. गेल्या पाच वर्षांपासून जोशी कुटुंबाकडून दिल्या जाणाऱ्या या पुरस्काराची परंपरा आजही सुरू आहे. या उपक्रमाची परिसरात चर्चा आहे.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
गुरूवार दि.५ फेब्रुवारी २०२६


## शोकाकुल वातावरणात स्व.अजितदादा पवार यांच्या अस्थीकलशाचे बीडकरांनी घेतले दर्शन

# बीड शहरात स्व.अजितदादांचा पुर्णाकृती पुतळा उभारणार-आ.पंडित

गेवराई । प्रतिनिधी

**बीड येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा कार्यालयात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांचा अस्थीकलशन दर्शनासाठी ठेवण्यात आला होता. यावेळी शोकाकुल वातावरणात अस्थीकलशाचे दर्शन घेताना लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि बीडकरांचे डोळे पानावले. यावेळी अतिशय जड अंत:करणाने उपस्थितांनी अस्थीकलशाचे दर्शन घेताना माना झुकवल्या. दुपारी २ वाजेपर्यंत राष्ट्रवादी कार्यालयात अस्थीकलश ठेवण्यात आला होता. त्यानंतर आ. विजयसिंह पंडित अस्थीकलश घेऊन श्री क्षेत्र राक्षसभुवन (शनिचे) येथे रवाना झाले. शोकाकुल वातावरणात अस्थी विसर्जन**



### श्रीक्षेत्र राक्षसभुवन (शनिचे) येथे झाले अस्थीचे विसर्जन

**होताना उपस्थितांनी अजितदादा अमर रहेच्या घोषणा दिल्या. आपला लाडका नेता आपल्याला सोडून गेल्याची भावना प्रत्येकाने यावेळी व्यक्त केल्या.**

यावेळी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, महाराष्ट्राचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांचे अकस्मिक दुःखन निधन झाले. स्व.अजितदादांच्या जाण्याने महाराष्ट्रावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. आजही स्व.अजितदादा पवार हे आपल्यात नाहीत हे मन मानायला तयार नाही. स्पष्टोक्तेपणा, धाडसी निर्णय आणि कामावरचा विश्वास ही दादांची खरी ओळख होती. संकाटातही न डगमगता राज्याच्या विकासासाठी झटणारा नेता म्हणून अजितदादा कायम स्मरणात राहतील. स्व.दादांच्या नेतृत्वाखाली बीड शहरातील जनतेने नगर पालिका निवडणुकीत भरभरून आशिर्वाद दिले. बारामतीसारखा बीड शहराचा विकास करण्याचा संकल्प आदरणीय दादांनी केला होता, असे दादा बीडकरांच्या कायम स्मरणात राहावेत यासाठी शहरात स्व.अजितदादा पवार यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्याचा संकल्प आम्ही केला ▶▶ पान २ वर

#### धनंजय मुंडे भावूक झाले

बीडमध्ये आस्थी कलश आल्यानंतर या ठिकाणी माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी अंतदर्शन घेतले. यावेळी आ. धनंजय मुंडे यांना उद्देशून अजित दादांचे भाषण रेकॉर्डवर चालू होते. अंत्यदर्शनाच्या वेळी हे भाषण ऐकून आ. धनंजय मुंडे भावुक झाले. त्यांच्या डोळ्यातून अश्रू येत होते.

## चोरी झाल्याची खोटी माहिती देणारा जेलमध्ये

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील कुंभारवाडी येथील प्रदोष गंगाधर जाधव याने ११२ नंबर वर डायल करून चोरी झाल्याची खोटी माहिती दिली आणि नंतर पोलिसांना काम लावण्यासाठी आपण ही माहिती दिल्याचे त्यांनी सांगितले. याबरोबर पोलिसांशी अरेरावी ही केली. याप्रकरणी गुन्हा दाखल होऊन जाधव याची बीड जिल्हा कारागृह रवानगी करण्यात आली आहे.

नागरिकांच्या सोयीसाठी आणि पोलिसांची तत्पर सेवा मिळावी यासाठी ११२ हा नंबर डायल करण्याचे आवाहन करण्यात येते. दि.३० जानेवारी रोजी रात्री १०:२० च्या सुमारास प्रदोष गंगाधर जाधव याने मादळमोही येशील बालाजी ट्रेडिंग कंपनी येथे सोन्याची आणि पैशाचे चोरी झाली आहे अशी माहिती ११२ नंबर डायल करुन दिली.मादळमोही पोलीस चौकीतील पोलीस उपनिरीक्षक राजाभाऊ गरजे व पोलीस हवालदार संजय गुजर यांनी त्याला घटना स्थळाचा पत्ता विचारला असता चोरी वगैरे काहीही झाली नाही. पोलिसांना काम लावण्यासाठी आणि त्यांना त्रास व्हावा म्हणून मुद्दाम मी फोन केला असे उद्धटपणे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी या इसमाचा आणि घटनास्थळाचा शोध घेतला असता सदरची माहिती खोटी असल्याचे स्पष्ट झाले. याप्रकरणी संजय गुजर यांच्या फिर्यादीवरून जाधव यांच्यावर कलम २१२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. यावेळीही त्याने तुम्ही माझ्यावर गुन्हा दाखल केला.तुम्ही नोकरी कशी करतात ते पाहतो अशी धमकी दिली. त्यानंतर पुन्हा अदखल पात्र कलम २२४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. त्याला विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांच्या समक्ष हजर केले असता त्यांनी नऊ फेब्रुवारीपर्यंत त्याला न्यायालयीन कोठडी मंजूर करून त्याची रवानगी जिल्हा कारागृहात केली आहे. ही कारवाई वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पवार, पोलीस उपनिरीक्षक राजाभाऊ गरजे, पोलीस हवालदार विजय परजणे, संजय गुजर, शेखर हिंगावर यांनी केली.

## सवसवाडी येथे ओंकारेश्वर शिवमंदिरात शुक्रवारी महादेवमूर्ती प्राणप्रतिष्ठा

बीड । प्रतिनिधी



**शिरूर कासार तालुक्यातील सवसवाडी येथे श्री महादेव, नंदी मूर्ती प्राणप्रतिष्ठापना व कलशारोहण कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवार दिनांक ६ फेब्रुवारी करण्यात आले आहे. सदर कार्यक्रम महामंडलेश्वर स्वामी त्रिविक्रमानंद सरस्वतीजी यांच्या शुभहस्ते होणार आहे. तर आष्टी, पाटोदा शिरूर चे आ. सुरेश धस यांच्या प्रमुख उपस्थितीत सदर कार्यक्रम संपन्न होणार आहे.**

सवसवाडी येथे भव्य शिवमंदिर उभारण्यात आले आहे. या मंदिरामध्ये श्री महादेव, नंदी मूर्तीची स्थापना करण्यात येणार आहे. त्यानिमित्ताने दिनांक ५ फेब्रुवारी रोजी सकाळी मूर्तीची शोभायात्रा, कुंडसंस्कार, होमहवन, तर दिनांक ६ रोजी मूर्ती प्राणप्रतिष्ठापना व होमहवन आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी ५१ फूट उंच धर्मध्वज आमदार सुरेश धस यांच्या शुभहस्ते उभारण्यात येणार आहे. भाविक भक्तांनी सदर कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन सवसवाडी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

## अंबाजोगाईत १५३ बालकांची तपासणी, २० चिमुकल्यांवर होणार मोफत हृदय शस्त्रक्रिया

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**येथील रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी, घुगे हार्ट ॲंड क्रिटिकल केअर हॉस्पिटलमध्ये शून्य ते अठरा वर्षे वयोगटातील मुलांसाठी आयोजित करण्यात आलेले मोफत बाल हृदयरोग तपासणी व टू-डी इको कलर डॉपलर शिबिर यशस्वीरीत्या संपन्न झाले.**



या शिबिरात एकूण १५३ बालकांची तज्ज्ञांकडून तपासणी करण्यात आली. त्यापैकी गंभीर आजार आढळलेल्या २० बालकांवर पुणे येथे मोफत हृदय शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याची माहिती हृदयरोगतज्ज्ञ डॉ. नवनाथ घुगे यांनी दिली. हे शिबिर घुगे हॉस्पिटल, आय.एम.ए.महाराष्ट्र राज्य,रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम महाराष्ट्र शासन आणि लिटल हार्ट केअर हॉस्पिटल, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केले होते.शिबिराचे उद्घाटन अक्षय मुंदडा यांनी केले. याप्रसंगी आय.एम. ए. राज्याध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी रोटरीच्या अध्यक्ष रोहिणी पाठक, पुणे येथील बाल ▶▶ पान २ वर

## विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी स्वच्छतागृहाची दररोज साफसफाई बंधनकारक-प्रा.आंधळे

बीड । प्रतिनिधी



जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमधील स्वच्छता ग्रहाची अवस्था वाईट झाल्याचे निदर्शनास आले आहे त्याची दररोज स्वच्छता झाली पाहिजे परंतु जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सेवक पदाला मंजुरी नाही मग ही कामे कोण करणार असा प्रश्न निर्माण झाला आहे शाळेमध्ये स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी नियुक्त नसल्याने अनेक ठिकाणी स्वच्छता ग्रहाची साफसफाई होत नसल्याचे आढळून आले आहे याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होत आहे या पार्श्वभूमीवर ग्रामीण युवक संघटनेने ही मागणी केल्यानंतर तात्काळ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पंचायत समितीतील गट विकास अधिकाऱ्यांना आदेश दिले आहेत ग्रामपंचायत अंतर्गत कार्यरत असलेल्या स्वच्छता कामगारा मार्फत दररोज शाळेतील स्वच्छताग्रहाची साफसफाई करण्यात यावी असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले आहेत तसेच संबंधित ग्रामसेवक, सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांना याबाबत सूचित करून कामात ▶▶ पान २ वर

# बीड शहरासाठी बिंदुसरा प्रकल्पातून नवीन पाणी पुरवठा योजना राबवावी

## भाजप गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागरांसह शिष्टमंडळाची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

बीड । प्रतिनिधी

शहरातील सध्याचा विस्कळीत पाणीपुरवठा, उन्हाळ्यात दरवर्षी भेडसावणारी पाणीटंचाई, पुरवठ्याच्या नियोजनातील त्रुटी आणि येत्या उन्हाळ्यातील संभाव्य अडचणी लक्षात घेऊन आता बीड शहरासाठी बिंदुसरा प्रकल्पातून नवीन अतिरिक्त पाणीपुरवठा योजना तातडीने प्रस्तावित करून कामांना गती द्यावी, अशी मागणी भाजपच्या गटनेत्या व नगरसेविका डॉ.सारिकाताई योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखालील



शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेऊन मंगळवारी (दि.३) केली. या मागण्यांवर जिल्हाधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

सध्या बीड शहराला बिंदुसरा प्रकल्पातून अंशतः पाणीपुरवठा होत असून तो पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासाठी शहरालगत घुमरे वस्ती व धानोरा रोड मार्गे नवीन पाणीपुरवठा योजना उभारणे आवश्यक असल्याचे शिष्टमंडळाने निदर्शनास आणून दिले. तसेच, नव्याने विकसित झालेल्या वस्त्यांसाठी स्वतंत्र पाण्याच्या टाक्या व वितरण व्यवस्था उभारण्यात यावी. सध्या शहरातील अनेक भागात ८ ते १५ दिवसांच्या अंतराने पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शहरात पाण्याची उपलब्धता असूनही योग्य नियोजनाच्या अभावामुळे पुरवठा विस्कळीत होत असल्याचे सांगत सर्व भागांना नियमित व समान पाणीपुरवठा करण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शिष्टमंडळाने केली. यासोबतच अमृत अटल पाणीपुरवठा योजना १.० अंतर्गत उर्वरित कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व संबंधित कंत्राटदारांकडून तातडीने पूर्ण करून ▶▶ पान २ वर

#### मालमत्ता नोंदणी मोहिमेसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी

बीड शहराचा झपाट्याने विस्तार होत असून नव्या मालमत्तांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या सर्व मालमत्तांची नोंद नगरपरिषदेच्या अभिलेखात असणे आवश्यक असल्याने व्यापक मालमत्ता नोंदणी (असेसमेंट) मोहीम राबविण्यासाठी विशेष निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी भाजपच्या गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केली आहे. मालमत्ता नोंदणी पूर्ण झाल्यास नगरपरिषदेचा महसूल वाढून शहरातील विविध विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध होण्यास मदत होईल. या मोहिमेसाठी सुमारे एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

### राज्याचे कौशल्यविकास मंत्री ना.मंगलप्रभात लोढा यांची कृषीकुल प्रशिक्षण केंद्रास भेट

## ग्लोबल विकास ट्रस्टचे काम शेतकऱ्यांचे जीवन उंचावणारे-ना.मंगलप्रभात लोढा

परळी वै.। प्रतिनिधी

राज्याचे कौशल्य विकास, रोजगार तथा उद्योजकता मंत्री ना. मंगलप्रभात लोढा यांनी बुधवार, दिनांक ०४ रोजी ग्लोबल विकास ट्रस्टच्या कृषीकुल प्रशिक्षण केंद्रास भेट दिली. संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी, ट्रस्टी संजय परमार तसेच सर्व कृषीकुल कृषी सेवकांच्या वतीने स्वागत व सत्कार करण्यात आला. यावेळी ना.लोढा यांनी ग्लोबल विकास ट्रस्टच्या संपूर्ण कामकाजाची माहिती घेऊन, शेतकऱ्यांसाठी अतिशय उपयुक्त असे कामकाज होत असल्याबाबत कामाचे कौतुक केले. मराठवाड्यातील शेतीला तांत्रिक ▶▶ पान २ वर



## पाटोदा तहसील कार्यालयात रेशन कार्डाच्या नावाखाली लूट

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात रेशन कार्डाशी संबंधित कामांसाठी सर्वसामान्य जनतेची मोठी आर्थिक लूट होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. नवीन रेशन कार्ड काढण्यापासून ते साध्या नाव दुरुस्तीपर्यंत प्रत्येक कामासाठी शासनाने ठरवून दिलेल्या दरांपेक्षा कित्येक पटीने जास्त पैसे उकळले जात असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे, कार्यालयात अधिकृत दर फलक लावणे अनिवार्य असतानाही, या नियमाला हरताळ फासला जात आहे.

अशी होतेय सर्वसामान्यांची लूट: मिळालेल्या माहितीनुसार, पाटोदा तहसीलच्या पुरवठा विभागात रेशन कार्डाच्या विविध कामांसाठी खालीलप्रमाणे अवैध दर आकारले जात आहेत: ई-रेशन कार्ड प्रिंट: ५०० रुपये नाव वाढवणे: २०० रुपये नाव कमी करणे: २०० रुपये नाव दुरुस्ती करणे: ३०० रुपये नवीन रेशन कार्ड काढणे: १२०० रुपये वास्तविक पाहता, या सेवांचे शासकीय शुल्क अत्यंत अल्प असूनही एजंट व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने गरिबांच्या खिशावर दरोडा टाकला जात आहे. दुष्काळग्रस्त आणि कष्टकरी भागातील जनता आपल्या हक्काच्या रेशन कार्डासाठी एवढी मोठी रक्कम कुठून आणणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. शासकीय नियमांनुसार, प्रत्येक तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात नागरिकांना समजेल अशा दर्शनी भागात सेवांचे अधिकृत 'दर फलक' ▶▶ पान २ वर

## आवादा कंपनीच्या विरोधात आत्मदहन करण्याचा शेतकऱ्यांनी तहसीलदार यांना निवेदनाद्वारे दिला इशारा

केज । प्रतिनिधी

**शेतकऱ्याची झालेली नुकसान ही भरून न दिल्यास आवादा कंपनीच्या विरोधात आत्मदहन करणार असल्याचा इशारा केज तहसीलदार यांना लेखी निवेदनाद्वारे शेतकरी अशोक उत्तम गायकवाड यांनी दिला आहे.**

केज तालुक्यातील शिरुरघाट येथील शेतकरी अशोक उत्तम गायकवाड यांची नांदुरघाट शिवरात स.नं.१२६/२ मध्ये जमीन असून सदर जमिनीत त्यांचा एक बोरवेल आहे. अशोक गायकवाड यांच्या बोरवेल चे आवादा कंपनीकडून नुकसान झालेले आहे. अशोक गायकवाड यांच्या बोरवेलचे झालेले नुकसानीचे काम त्यांना करून घेण्यासाठी सांगितले. त्यावरून गायकवाड यांनी त्यांच्या बोरवेलचे दुरुस्तीचे काम केले आहे. गायकवाड यांच्या बोरवेलचे दुरुस्तीचे काम हे गायकवाड यांनी केले असता त्यांना दुरुस्तीसाठी लागलेल्या खर्चा पोटीचे पैसे सदरील कंपनीने अद्यापही दिलेले नाहीत. तर आता ही कंपनी पळून गेली आहे. संबंधित महसूल विभागाचे मंडळ अधिकारी व तलाठी यांनी पंचनामा केला आहे. गायकवाड यांचे आर्थिक नुकसान झालेले असुन या नुकसान झालेल्या घटनेला अनेक दिवसाचा कालावधी झालेला आहे. तरी त्यांना सदरील आवादा कंपनीने अद्यापही नुकसान भरपाई दिलेली नाही.त्यामुळे अशोक गायकवाड यांना त्यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई कंपनीने तात्काळ न दिल्यास शिरूर घाट येथील शेतकरी अशोक उत्तम गायकवाड हे दिनांक ११ फेब्रुवारी २०२६ रोजी मस्साजोग येथील आवादा कंपनीच्या (झिरो पॉईंट) या ठिकाणी आत्मदहन करणार आहेत. असे लेखी निवेदनाद्वारे प्रशासनाला अशोक उत्तम गायकवाड यांनी इशारा दिला आहे. या निवेदनाच्या प्रती तहसीलदार केज, मुख्यमंत्री कार्यालय, महाराष्ट्र राज्य मुंबई, उपमुख्यमंत्री कार्यालय, महाराष्ट्र राज्य मुंबई, पोलीस ठाणे केज, आवादा कंपनी मस्साजोग यांना दिल्या आहेत.

# अवैध दारू व गुटखा विक्री करणारे दोघे अटकेत

## बीड ग्रामीण पोलिसांची कामगिरी, पन्नास हजाराचा मुद्देमाल ताब्यात

बीड । प्रतिनिधी

**बीड ग्रामीण पोलिसांनी दोन वेगवेगळ्या ठिकाणी अवैध गुटखा व दारू विक्री करणाऱ्या इसमावर कारवाई करून त्यांच्याकडून जवळपास ५० हजाराचा माल जप्त केला. ४४ हजार ६९५ रुपयांचा गुटखा आणि ७३०० रुपयांची चोरटी दारू पोलिसांनी ताब्यात घेतली.**





बीड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक मुदीराज व त्यांचे सहकारी जोगदंड, चव्हाण हे पेट्रोलिंग करत असतांना बार्शी रोडच्या बाजूला सामनापूर शिवारात माऊली पान सेंटरवर धाड टाकून चंद्रकांत बाळाराम कांबळे हा प्रतिबंधित केलेला हिरा, विमल, गोवा, बायोबाजी, राजनिवास, रॉयल टोबॅको, जफरानी जर्दा, तंबाखू विकत असलेला आढळून आला. पोलिसांनी त्याच्याकडून ४४ हजार ६९५ रूपयाचा माल जप्त केला. याप्रकरणी मनोज जोगदंड यांच्या फिर्यादीवरून ग्रामीण पोलीस ठाण्यात कलम १२३, २२३, २७४, २७५ भारतीय न्याय संहिता नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. याच दिवशी दिनांक ३ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी साडे सहाच्या सुमारास कोल्हारवाडी शिवारात आजिनाथ मारोती वडमारे हा देशी दारू बेकायदेशीर चोरटी वाहतूक करताना पकडला. त्याच्याकडून १४६ बाटल्या ज्याची किंमत सात हजार तीनशे रुपये आहे. त्या जप्त केल्या या प्रकरणी नामदेव सानप यांचे फिर्यादीवरून बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारूबंदी कायदा नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई अशोक मुदीराज, मनोज जोगदंड, नामदेव सानप, संतोष कोठुळे, चव्हाण यांनी केली.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26


# पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी ६ हजार कोटींचे कर्ज

## १० फेब्रुवारीला मंत्रिमंडळात प्रस्ताव

पुणे । प्रतिनिधी

**पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भूसंपादनासाठी आवश्यक असणारा निधी उभारण्यासाठी कर्ज घेण्यात येणार आहे. त्याचा सविस्तर प्रस्ताव १० फेबुवारी रोजी होणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीत सादर करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्य सचिव राजेश अग्रावाल यांना दिले. भविष्यातील पुणे शहराची गरज लक्षात घेऊन पुरंदर विमानतळाची निर्मिती करावी तसेच विमानतळ परिसराचा नियोजनबद्ध विकास करण्यासाठी सिडकोलाही निर्देश देण्यात आले आहेत.**





पुरंदर विमानतळाबाबत वर्षा निवासस्थानी आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. या वेळी मुख्य सचिव राजेश अग्रावाल, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी. गुप्ता, अपर मुख्य सचिव (परिवहन) संजय सेठी, प्रधान सचिव (उद्योग) पी. अन्बळगन, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारसू तसेच ऑनलाईन माध्यमातून जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी उपस्थित होते. पुरंदर तालुक्यातील सात गावांमध्ये हे विमानतळ होणार असून, यासाठी सुमारे ३ हजार एकर जमीन संपादित करण्यात येणार आहे. यासाठी सुमारे ६ हजार कोटी रुपये लागणार आहेत. यासाठी राज्य सरकारने कर्ज उभारण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भातील प्रस्ताव राज्य मंत्रिमंडळाने मान्य केल्यानंतर तो हुडकोकडे पाठविण्यात येणार आहे. फडणवीस म्हणाले, पुरंदर विमानतळाचा परिसर आता झपाट्याने विकसित होणार आहे. हा विकास परिसर म्हणून गणला जाणार आहे. त्याची अनियंत्रित वाढ होऊ नये, यासाठी आतापासूनच नियोजन करावे. यासाठी सिडकोने पुढाकार घ्यावा. हे नियोजन नवी मुंबईप्रमाणे असावे. भविष्यातील पुणे शहराची गरज लक्षात घेऊन पुरंदर विमानतळाची निर्मिती करावी, असे निर्देश फडणवीस यांनी या वेळी दिले.

### एप्रिलपासून कामाला सुरुवात होऊ शकते

मंत्रिमंडळ बैठकीत प्रस्तावाला मान्यता मिळाल्यानंतर फेबुवारी अखेरपर्यंत हा निधी जिल्हा प्रशासनाला उपलब्ध होण्याची शक्यता आहे. त्यानंतर पुढील आठवडाभरात शेतकऱ्यांना मोबदल्याचे वाटप करण्यात येऊ शकते. त्यानंतर भूसंपादन पूर्ण करून एप्रिलच्या मध्यापासून विमानतळाच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात होऊ शकते.

# मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर भीषण अपघात; २५ किमी वाहतूक कोंडी

## सुनेत्रा पवारांकडून अडकलेल्या प्रवाशांसाठी पाणी व नाश्त्याची तात्काळ व्यवस्था

पुणे । प्रतिनिधी

**मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर टँकर उलटल्याने मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. या अपघाताला २४ तास उलटूनही अद्याप वाहतूक पूर्णपणे सुरळीत झालेली नाही. सध्या या द्रुतगती महामार्गावर एकेरी वाहतूक सुरू आहे. मंगळवारी (३फेब्रुवारी) सायंकाळी पाचच्या सुमारास खोपोलीजवळील आडोशी बोगद्याजवळ अत्यंत ज्वलनशील गॅस वाहतूक करणाऱ्या टँकरचा भीषण अपघात झाला. या अपघातामुळं मोठी वाहतूक कोंडी झाली आहे. अशातच तहानलेल्या आणि उपाशी प्रवाशांच्या मदतीसाठी राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार धावल्या आहेत. यावेळी सुनेत्रा ताई पवार यांनी तात्काळ मदतीचे निर्देश दिले होते. त्यानुसार प्रवाशांना पिण्याच्या पाण्याची, नाश्त्याची सोय करण्यात आली आहे.**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर टँकरा भीषण अपघात झाला आहे. या अपघातानंतर टँकरमधून गॅसची गळती सुरु झाल्याने सुरक्षेच्या कारणास्तव मुंबईकडे जाणारी वाहतूक तात्काळ बंद करण्यात आली होती. परिणामी द्रुतगती महामार्गासह जुना पुणे-मुंबई मार्गही बंद ठेवण्यात आला आहे. या अपघातामुळं तब्बल २५ किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या असून, अनेक प्रवासी वाहनांमध्ये



अडकून पडले आहेत. या कोंडीत रुग्ण, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, महिला व पुरुष अशा सर्वांनाच प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा ताई पवार यांनी तात्काळ मदतीचे निर्देश दिले. ही मदत राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या, माजी नगरसेविका व स्थायी समितीच्या माजी अध्यक्षा सीमा ताई सावळे यांच्या मार्फत अडकलेल्या नागरिकांपर्यंत पोहोचवण्यात आली. सीमा ताई सावळे यांनी स्वतः घटनास्थळी उपस्थित राहून प्रवाशांची आपुलकीने विचारपूस केली. तसेच अडकलेल्या नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची, नाश्त्याची आणि आवश्यक प्राथमिक मदतीची तात्काळ व्यवस्था करण्यात आली. संकटाच्या काळात नागरिकांना मानसिक आधार देत त्यांनी त्यांना धीर दिला. या मदतकार्यामुळे अडकलेल्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला असून, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या संवेदनशील नेतृत्वाखाली आणि सीमा ताई सावळे यांच्या तत्पर व जबाबदार कार्यातून समाजाप्रती असलेली बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. पुण्याहून मुंबईला जाणाऱ्या सर्व एसटी बसच्या फेऱ्या रद्द करण्यात आल्याची माहिती एसटी प्रशासनाने दिली आहे. मुंबई-पुणे महामार्गावर आडोशी बोगज्याजवळ प्रोपोलिन गॅस टँकर उलटल्याने मोठी गळती सुरु होती. यामुळं मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली आहे. अद्यापही मोठी वाहतूक कोंडी असल्याचे असटी प्रशासनाने बसच्या फेऱ्या रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबई सेंट्रल, दादर, ठाणे, बोरीवली कडे जाणाऱ्या सर्व एस टी बसेसच्या फेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत. पुढील काही तासासाठी बसेस फेऱ्या बंद राहणार असल्याची माहिती एसटी प्रशासनाने दिली आहे.

# स्व.अजित पवार यांच्या अस्थिकलश रथाचे भावनिक स्वागत

पुणे । प्रतिनिधी

**राजगुरुनगर (ता. खेड) - तिन्हेवाडी येथे बुधवारी (दि. ४) स्व. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अस्थिकलश रथाचे आगमन भावपूर्ण वातावरणात झाले. वाफगाव-रेटवडी गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अधिकृत उमेदवार अश्विनीताई राजूशेठ पाचारणे यांच्या हस्ते रथाचे पूजन करण्यात आले.**

या वेळी शालेय विद्यार्थी, ग्रामस्थ आणि पक्ष कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्व. अजितदादांना श्रद्धांजली अर्पण केली. अश्विनीताई पाचारणे यांच्या नेतृत्वाखाली वाफगाव-रेटवडी जिल्हा परिषद गटातील अनेक गावांमध्ये अस्थिकलश रथ नेण्यात आला. गावोगावच्या नागरिकांनी गर्दी करून कलशाचे पूजन केले आणि त्याला आदरपूर्वक अभिवादन केले. तिन्हेवाडी परिसरात भावनिक वातावरण पसरले होते; अनेकांनी अश्रू ढाळत अजितदादांना आदरांजली दिली. अस्थिकलश रथाच्या आगमनानंतर नागरिकांनी दर्शनासाठी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. कार्यक्रमात पक्षाचे जिल्हा युवक अध्यक्ष निलेश थिगळे, रेटवडी पंचायत समिती गणाचे उमेदवार प्रा. बापू चौधरी, महेंद्र वरकड, ग्रामपंचायत सदस्य प्रियांकाताई पाचारणे, माजी उपसरपंच सीमाताई आरुडे, पांडुरंग गायकवाड, संतोष नाना पाचारणे आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी एकत्र येऊन स्व. अजित पवार यांच्या स्मृतीला श्रद्धांजली अर्पण केली. स्व. अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर महाराष्ट्रभर त्यांच्या अस्थिकलशाची यात्रा सुरू आहे. विविध जिल्हे आणि गावांमध्ये रथ नेण्यात येत असून, लाखो कार्यकर्ते आणि नागरिक भावपूर्ण श्रद्धांजली वाहत आहेत. तिन्हेवाडीतील हा कार्यक्रमही त्या यात्रेचा एक भाग होता. राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते आणि स्थानिक



नागरिकांनी कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत भावपूर्ण पद्धतीने केले. उपस्थितांनी अजितदादांच्या विकासकामांचे स्मरण करून त्यांच्या विचारांना पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला. या प्रसंगी अनेकांनी घोषणा केली की, अजितदादा अमर राहो, अशी वातावरणात गुंज निर्माण झाली. कार्यक्रमात सहभागी नागरिकांनी म्हणाले, कामाचा माणूस आणि आम्हा बहिणींचा लाडका भाऊ गमावल्याचे खूप दुःख आहे. दादांच्या अकस्मात निधनाने महाराष्ट्र, विशेषतः पुणे जिल्ह्यातील राजकारणात अंधःकार पसरला आहे. आदरणीय अजितदादांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही पुढील काळात कार्यरत राहू. या भावनिक स्वागताने एकदा पुन्हा सिद्ध केले की, महाराष्ट्राच्या राजकारणातील एक दिग्गज नेता असलेल्या स्व. अजित पवार यांना जनतेतून आजही मोठा आदर आणि प्रेम मिळते.

# पुणे येथे राज्यस्तरीय नाभिक समाज वधू-वर पालक परिचय मेळाव्याचे आयोजन

पुणे । प्रतिनिधी

**महाराष्ट्र नाभिक महामंडळ, पुणे शहर यांच्या वतीने राज्यस्तरीय नाभिक समाज वधू-वर पालक परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती पत्रकार सुनील पोपळे यांनी दिली.**

नाभिक समाजातील विवाह इच्छुक वधू-वर तसेच त्यांच्या पालकांना एकाच ठिकाणी भेटीगाठी, माहितीची देवाणघेवाण व योग्य स्थळांची ओळख व्हावी, या उद्देशाने हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमाचा समाजातील सर्व बांधवांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात येत आहे.या मेळाव्यासाठी ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरू असून, इच्छुक वधू-वरांच्या पालकांनी खालील ई-मेल आयडीवर आपली नोंदणी करावी.वधु-वर नोंदनी ३० मार्च २०२६ पर्यंत करावी व मेळावा १२ एप्रिल २०२६ रोजी आहे ई-मेल :mahanabhikyahoo.in मेळाव्याचे कार्यालय / संपर्क पत्ता ९००, शुक्रवार पेठ, शाहू चौक, गणपती मंदिर शेजारी, पॉपुलर टावर, पुणे - ४११००२अधिक माहितीसाठी व नोंदणी संदर्भात संपर्क मोबाईल : ९४२०१२९२२४ तरी नाभिक समाजातील सर्व वधू-वर व त्यांच्या पालकांनी या राज्यस्तरीय पालक परिचय मेळाव्यात मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सुनील पोपळे यांनी केले आहे.

# घरगुती वादातून पत्नीची हत्या

## अपघाताचा बनाव, नातेवाईकांकडून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात घरगुती वादातून पतीने पत्नीच्या डोक्यावर जड वस्तूने वार करत तिची हत्या केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. या घटनेनंतर पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी हा प्रकार अपघात असल्याचे भासवण्यात आला. तसेच घटनास्थळी सांडलेले रक्त पुसून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार तपासात समोर आला आहे. या प्रकरणी पतीसह त्याच्या दोन नातेवाईकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मृत महिलेचे नाव वैष्णवी तुषार तुपसुंदर (वय २३) असून तिचा पती तुषार उर्फ गणेश विलास तुपसुंदर (वय २८, रा. भवानी पेठ, हरकरनगर) यानेच तिची हत्या केल्याचा आरोप आहे. तसेच, पुरावे नष्ट करण्यास मदत केल्याप्रकरणी मनोज रोहिदास कांबळे (वय ३९, रा. भवानी पेठ, कशेवाडी) आणि वनिता मनोज कांबळे (वय ३२) यांच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तुषार आणि वैष्णवी यांच्यात विवाहानंतर सातत्याने वाद होत होते. कौटुंबिक कारणांमुळे दोघांमध्ये तणाव वाढत होता. दोन



दिवसांपूर्वी या वादाचे रूपांतर तीव्र भांडणात झाले. या भांडणादरम्यान रागाच्या भरात तुषारने घरात असलेल्या जड व टणक वस्तूने वैष्णवीच्या डोक्यावर दोन ते तीन वेळा जोरदार वार केले. या हल्ल्यात ती गंभीर जखमी झाली. घटनेनंतर वैष्णवीला चक्कर येऊन ती पडल्याचे सांगत शेजाऱ्यांच्या मदतीने तिला तातडीने ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र तिच्या डोक्याला झालेल्या गंभीर दुखापतीमुळे उपचार सुरू असतानाच तिचा मृत्यू झाला. सुरुवातीला हा प्रकार अपघात असल्याचा दावा करण्यात आला होता. दरम्यान, आरोपी तुषारच्या नातेवाईकांनी घटनास्थळी सांडलेले रक्त पुसून काढत पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, मनोज कांबळे हा घराच्या दरवाजाजवळ उभा राहून कोणी येते का, यावर लक्ष ठेवून होता, तर वनिता कांबळे हिने घरातील फरशीवरील रक्ताचे डाग साफ केले. पोलिसांनी शेजाऱ्यांची चौकशी, घटनास्थळाची पाहणी तसेच वैद्यकीय अहवालाच्या आधारे सखोल तपास केला असता, हा प्रकार अपघात नसून नियोजितपणे सत्य लपवण्याचा प्रयत्न केल्याचे निष्पन्न झाले. वैष्णवीच्या डोक्याला झालेल्या जखमा सामान्य पडण्यामुळे होऊ शकत नसल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले. या प्रकरणी तिघांविरोधात खडक पोलीस ठाण्यात खुनाचा व पुरावे नष्ट केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करत आहेत.

# 'द व्हाय कोड' पुस्तकाचे सिंहगडावर भव्य प्रकाशन

पुणे । प्रतिनिधी

**पुण्यातील ऐतिहासिक सिंहगडावर लेखक संतोष सुरपुरे यांच्या 'द व्हाय कोड' या प्रेरणादायी पुस्तकाचे प्रकाशन मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाला राजगोपाल मिनीयर (फायनान्स कमिटी मेंबर, श्रीराम मंदिर अयोध्या तीर्थ क्षेत्र), अमोल शिंगाटे (डायरेक्टर, सुप्रीम फैसिलिटी) आणि संशोधक डॉ. नंदकिशोर मते हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच रो. कुशल करेवार यांचीही उपस्थिती होती.**

कार्यक्रमात बोलताना प्रमुख पाहुण्यांनी सांगितले की, आजच्या धावपळीच्या युगात सुख आणि आनंद यातील फरक समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे. भौतिक सुख मिळू शकते, मात्र खरा आनंद उद्दिष्टपूर्ण जीवनातूनच प्राप्त होतो. 'द व्हाय कोड' या पुस्तकात लेखकाने जीवनातील पाच महत्त्वाच्या घटकांवर सखोल अभ्यासपूर्वक प्रकाश टाकला आहे. लेखक संतोष सुरपुरे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, आपण जे काही करतो, त्यामागे स्पष्ट उद्दिष्ट नसेल तर यश मिळूनही जीवन निराशाजनक ठरते. त्यामुळे प्रत्येक कृती ही अर्थपूर्ण आणि उद्दिष्टपूर्ण असणे आवश्यक आहे. कार्यक्रमाची सांगता रो. अतुल कारले यांनी केली. त्यांनी पुस्तकाचे महत्त्व अधोरेखित करत हे पुस्तक विविध ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर उपलब्ध असून जगभरातील वाचकांनी ते वाचावे, असे आवाहन केले. उपस्थित मान्यवर व प्रेक्षकांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. हा कार्यक्रम जीवनातील आनंद, उद्दिष्ट आणि आत्मसमाधान यांचे महत्त्व अधोरेखित करणारा ठरला. 'द व्हाय कोड' हे पुस्तक वाचकांना सुखापेक्षा आनंदी जीवन जगण्याची दिशा देईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# अजित पवारांच्या कथित विमान अपघातावर संशय

## सरपंचांच्या माहितीनंतर अमोल मिटकरींचा गंभीर आरोप




पुणे । प्रतिनिधी

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यनंतर आमदार अमोल मिटकरी यांनी आता आणखी एक दावा केला आहे. अजित पवारांच्या मृत्यूदिवशी संध्याकाळी पाच वाजता घटनास्थळी गेलो असता तेथील सरपंचाने धक्कादायक माहिती दिली. विमान कोसळत असताना त्यातून कुणीतरी बाहेर पडण्याचा प्रयत्न करत होते. त्या व्यक्तीला वाचवण्यासाठी आम्ही जात असताना स्फोट झाला अशी माहिती सरपंचांनी दिली असल्याचा दावा अमोल मिटकरी यांनी केला.**

या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आल. मात्र विमानात सहा जण असताना पाच मृतदेह कसे मिळाले? सहावा व्यक्ती कुठे गेला? असा प्रश्न अमोल मिटकरींनी विचारला. आमदार अमोल मिटकरी म्हणाले की, घटनेच्या दिवशी अंत्यविधी आटोपल्यानंतर आपण घटनास्थळी पोहोचलो. त्या ठिकाणचे सरपंचांनी आम्हाला सांगितलं की, कुणीतरी त्या विमानातून उडी मारण्याची धडपड करत होते. आम्ही त्याला वाचवण्यासाठी गेलो असता त्याचा मोठा स्फोट झाला. त्यानंतर त्या ठिकाणी पाच मृतदेह सापडल्याची माहिती समोर आली. डीजीसीए म्हणतंय सहा जणांचा मृत्यू झाला, मात्र त्या ठिकाणी पाच मृतदेह सापडले. याची चौकशी झाली पाहिजे. दरम्यान, गोजुबावीचे सरपंच कल्याण आटोळे यांनी हा अपघात प्रत्यक्ष पाहिल्याचा दावा केला. अपघातावेळी विमानाचा दरवाजा उघडा असल्याची त्यांनी माहिती दिली. निळी पँट घातलेला व्यक्ती बाहेर येतोय असं आधी वाटलं, पण नंतर तसं काही दिसलं नाही. तसेच हे विमान अजितदादांचे होते याची आम्हाला माहिती नव्हती, ते एखाद्या उद्योगपतीचे असेल असं वाटलं होतं. सरपंच कल्याण आटोळे यांनी या प्रकरणी शरद पवारांची भेट घेतली आणि त्यांना सगळी माहिती दिली. विमानाने आधी दोन वेळेस घिरट्या घातल्या आणि नंतर खाली येत असताना हा अपघात झाला असा दावा त्यांनी केला. दरम्यान, अजित पवारांच्या विमान अपघातावर अनेकांनी शंका व्यक्त केली असून त्याची चौकशी करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणाची केंद्रीय स्तरावर चौकशी सुरू करण्यात आली आहे.

# लोणावळ्यात बुलेटराजांना पोलिसांचा दणका

## ३४ दुचाकींवर कारवाई, ५५,५०० रुपये दंड वसूल

पुणे । प्रतिनिधी

**पर्यटकांची आवडती लोणावळा शहर आणि परिसरात अनेक दिवसांपासून ध्वनी प्रदूषण करणाऱ्या दुचाकीस्वारांचा गोंगाट वाढलेला होता. विशेषतः शाळा-महाविद्यालयांच्या बाहेर आणि गर्दीच्या ठिकाणी, काही तरुण पंधराहून अधिक बुलेट्ससह दुचाकींमध्ये मॉडिफाईड सायलेन्सर बसवून फटाक्यांसारखा आवाज करत नागरिकांना त्रास देत होते.**

या तक्रारीची दखल घेत ड. माधवराव भोंडे यांनी पोलिसांना निवेदन दिले आणि या व्यवहाराविरोधात कारवाईची मागणी केली. या तक्रारीनंतर पोलिस निरीक्षक राजेश रामाघरे यांच्या मार्गदर्शनाखाली शहर वाहतूक शाखेचे हवालदार अनिल शिंदे आणि त्यांच्या पथकाने विशेष मोहीम राबवली. मोहीमेत एकूण ३४ दुचाकींवर दंडात्मक कारवाई करण्यात आली, त्यामध्ये पंधराहून अधिक बुलेट्स होत्या. या कारवाईत ५५,५०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. पोलिसांनी फक्त दंड आकारण्यापुरताच मर्यादित राहिले नाही, तर नियमांचे उल्लंघन करणारे सायलेन्सरही जप्त केले आहेत. शहर पोलिसांनी स्पष्ट केले की, ही कारवाई शांतता राखण्यासाठी, पर्यटकांना आणि स्थानिक नागरिकांना होणारा त्रास कमी करण्यासाठी करण्यात आली आहे. नागरिकांनीही या कारवाईचे स्वागत केले असून, पोलिसांच्या या पावलामुळे शहरातील वातावरण सुधारेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करत, कुठलाही नियमभंग करणारा व्यवहार लक्षात आल्यास त्वरित पोलिसांकडे कळवावे, असे सांगितले आहे.

# पिंपरीत धक्कादायक प्रकार; मुलाने मित्राच्या मदतीने आईच्या प्रियकराचा निर्घृण खून

पिंपरी । प्रतिनिधी

**मुलाने मित्राच्या मदतीने आईच्या प्रियकराचा निर्घृण खून केला. ही धक्कादायक घटना चाकण उत्तर पोलिस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली आहे. ११ जानेवारी रोजी बिरदवडी गावच्या स्मशानभूमीच्या मागील ओढ्यालगत अनोळखी मृतदेह सापडला होता. २० दिवसांच्या अथक प्रयत्नानंतर चाकण उत्तर पोलिसांनी या क्लिष्ट खुनाचा उलगडा करत तीन आरोपींना अटक केली आहे.**

मुंजा धोंडीबा नरहिरे (२५, रा. गंगाखेड, जि. परभणी) असे खून झालेल्याचे नाव आहे. निखिल नानासाहेब चव्हाण (वय २१), उषा नानासाहेब चव्हाण (४०, दोघे रा. गंगाखेड, जि. परभणी), स्वप्निल नरहरी पारधी (१९, रा. खराबवाडी, ता. खेड; मूळ रा. ढोकी, ता. जि. नांदेड) यांना अटक करण्यात आले आहे. बिरदवडी गावच्या स्मशानभूमीच्या मागील ओढ्यालगत मोकळ्या जागेत एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आला होता. सदर इसमाचे वय अंदाजे २५ ते ३० वर्षे होते. अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरून धारदार हत्याराने डोक्यावर वार करून त्याचा खून केला होता. मृताची ओळख पटू नये, यासाठी त्याच्या चेहऱ्यावर दगडाने वार करून चेहरा छिन्नविछिन्न करण्यात आला होता. तसेच, मृताच्या खिशातील मोबाईल, ओळखपत्र व इतर वस्तू आरोपीने नेल्याने गुन्ह्याचा उलगडा करणे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. वरिष्ठांनी दिलेल्या सूचनांनुसार चाकण उत्तर पोलिस ठाण्याच्या तपास पथकाने घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. परिसरातील नागरिक, कंपन्यांतील कामगार, कामगार अड्डे येथे मयताचा फोटो दाखवून ओळख पटवण्याचा प्रयत्न करण्यात आला. नजिकच्या इतर पोलिस ठाण्यांतील मिसिंग तक्रारी तपासण्यात आल्या. मयताचे फोटोचे भिंतीपत्रके परिसरात लावण्यात आली. तसेच, सोशल मीडिया व वृत्तपत्रांच्या माध्यमातूनही मयत व त्याच्या नातेवाइकांचा शोध घेण्यात आला. तपास सुरू असताना गुन्ह्यात वापरलेल्या दुचाकीबाबत पोलिसांना माहिती मिळाली. पोलिसांनी दुचाकीच्या मालकाकडे चौकशी केली असता, त्याने मित्र आरोपी निखिल नानासाहेब चव्हाण याला वापरण्यास दिल्याचे सांगितले. निखिल याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता धक्कादायक वास्तव समोर आले. मयत मुंजा धोंडीबा नरहिरे याचे आरोपी उषा नानासाहेब चव्हाण हिच्याशी अनैतिक संबंध होते. मुंजा तिला सातत्याने त्रास देत होता. आईला त्रास होत असल्याने आरोपी निखिल चव्हाण संतप्त झाला होता. त्याने आपला मित्र आरोपी स्वप्निल नरहरी पारधी याला ही बाब सांगितली. त्यानंतर आरोपींनी आपसात संगनमत करून खून करण्याचा कट रचला. मयत मुंजा याला आरोपींनी गंगाखेड येथून चाकण येथे बोलावले. ७ जानेवारी रोजी सकाळी त्याला दुचाकीवर बसवून दारू पिण्याच्या बहाण्याने बिरदवडी गावच्या हद्दीतील स्मशानभूमीच्या मागील ओढ्यालगत निर्जन ठिकाणी नेण्यात आले. तेथे दारू पित असताना आरोपी निखिल आणि स्वप्निल यांनी कोयत्याने मुंजा याच्या डोक्यावर व तोंडावर वार करून त्याचा खून केला. ओळख पटू नये यासाठी डोक्यावर दगड घालून चेहरा छिन्नविछिन्न करण्यात आला. तसेच, त्याच्या जवळील सर्व वस्तू काढून आरोपी पसार झाले वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र कदम, पोलिस निरीक्षक (गुन्हे) विनोद पाटील यांच्यासह तपास पथकातील पोलिस उपनिरीक्षक चंद्रशेखर मोरखंडे, अंमलदार सुनील शिंदे, भैरोबा यादव, प्रितम ढमढेरे, योगेश कोळेकर, शिवाजी लोखंडे, महेश कोळी, शरद खैरनार, सुमित जगताप यांनी ही कामगिरी केली.